# पुढारी

संस्थापक – संपादक कै. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव,
मुख्य संपादक – डॉ. प्रतापसिंह ग. जाधव (पद्मश्री पुरस्काराने सन्मानित)

ज्येष्ठ शु. २, शके १९४४, श्री शिवशक ३४८
बुधवार, १ जून २०२२

६

● वर्ष : ८४ ● अंक : १४९



Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 *
Library




अकलूज : शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील सन १९९३-९४ मधील माजी विद्यार्थी बॅचमधील महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व विज्ञान शाखेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला.

यावेळी प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, माजी प्रा. डी. एन. कुतवळ, प्रा. बी. आर. कर्चे, प्रा. एस. यू. शिंदे, प्रा. आर. एस. सावळजकर, प्रा. आर. ए. कुंभार, प्रा. एस. एल. देवकर, युवराज मालुसरे, पद्मावती रहाटे, अरुण गुजर आदी उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत राजश्री निंबाळकर यांनी केले. सविता सातपुते यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी सर्व माजी विद्यार्थ्यांकडून सर्व प्राध्यापक व प्राचार्य यांचा सत्कार करण्यात आला.

तब्बल २८ वर्षांनंतर एकत्र आलेल्या सर्वांनी आपली ओळख करून देताना महाविद्यालयाचे आपल्या यशामध्ये असलेले योगदान स्पष्ट अधोरेखित केले. संस्थेचे संस्थापक सहकारमहर्षी शंकरव मोहिते-पाटील , संस्थेचे ज्येष्ठ संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या कार्यकाळातील शैक्षणिक प्रगती व सुविधा पाहून विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

या स्नेहमेळाव्यास जाकिर पठाण, मधुकर लोहकरे, रविराज लव्हाळे, अनिल ढोपे, एकनाथ कदम, नंदकुमार तिकोटे, अण्णा गोरे, सुरेश शिंदे, मनोज सुरवसे, विठ्ठल माने, प्रवीण कुंभार, प्रशांत कुलकर्णी, जितेंद्र गायकवाड, मारुती जाधव, शिरीष जमदाडे, नाना घळके, वंदना जाधव, वंदना मोरे, परवीन चिकाने असे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी व प्राचार्य दत्तात्रय बागडे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार रविराज लव्हाळे यांनी मानले.

जनमत सर्वसामान्यांचे
मंगळवार, ०७ जून २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात पर्यावरण दिन विविध उपक्रमांनी साजरा

संग्रामनगर दि.६ (प्रतिनिधी)- अकलूज येथे महाराष्ट्र शासन सोलापूर वन विभाग सोलापूर, वनपरिक्षेत्र माळशिरस आणि शंकरराव मोहिते महाविद्यालयातील पर्यावरण अभ्यास विभाग,राष्ट्रीय सेवा योजना,सांस्कृतिक व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बीज मटका वितरण, 'एक विद्यार्थी एक वृक्ष वाटप' व 'पोस्टर प्रदर्शन' अशा विविध उपक्रमांनी पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरसचे वनपरिक्षेत्र अधिकारी डी.एम. कोकरे हे उपस्थित होते.तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी.एस.बागडे हे उपस्थित होते.

महाविद्यालयातील पर्यावरण अभ्यास विषयाचे विद्यार्थ्यांनी आवाहन केल्याप्रमाणे एकुण ३६६४ विविध प्रकारच्या वृक्षांच्या बियांचे संकलन करण्यात आले. व संकलित केलेल्या बियांचे वितरण महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते वनपरिक्षेत्र अधिकारी यांना सुपूर्त करण्यात आले.यावेळी प्राथमिक स्वरूपात वनपरिक्षेत्र विभागाकडून ६०० रोपांचे वाटप महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना 'एक विद्यार्थी एक वृक्ष वाटप' या कार्यक्रमा अंतर्गत करण्यात आले.वाटप करण्यात आलेल्या रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करून झाडांच्या वाढीचा आढावा जिओ टॅग या पच्या माध्यमातून पर्यावरण विभागास द्यावा असे आवाहन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे वन अधिकारी कोकरे यांनी सांगितले की, पर्यावरण वाचविण्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करणे हि काळाची गरज आहे.यासाठी वन विभागाकडून ज्या विद्यार्थ्यांच्या वृक्षाची वाढ चांगली होईल त्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येईल.तर आपण दिलेल्या बियांची पुढच्या वर्षी पर्यंत आम्ही रोपे तयार करू असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयातील पर्यावरण अभ्यास विषयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण दिनानिमित्त जैव विविधता,पर्यावरण संवर्धन,पर्यावरण प्रदूषण या विषयावर तयार करण्यात आलेल्या पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे व



उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ.अपर्णा कुचेकर,डॉ. हनुमंत अवताडे,डॉ.विश्वनाथ आवड,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सज्जन पवार महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद,महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक युवराज मालुसरे तसेच शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यावरण अभ्यास विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब साळुंखे यांनी केले तर सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते व आभार डॉ.डि.जी.मगर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यावरण अभ्यास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. ०७ जून २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101



# वृक्षारोपण काळाची गरज : कोकरे

✔ सुराज्य/अकलूज

प्रत्येकाने वृक्ष लागवड ही स्वतःची जबाबदारी समजली पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांच्या वृक्षाची वाढ चांगली होईल त्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येईल असे मत वनपरिक्षेत्र अधिकारी दयानंद कोकरे यांनी व्यक्त केले.

अकलूज येथे महाराष्ट्र शासन सोलापूर वन विभाग सोलापूर, वनपरिक्षेत्र माळशिरस आणि शंकरराव मोहिते महाविद्यालयातील पर्यावरण अभ्यास विभाग,राष्ट्रीय सेवा योजना,सांस्कृतिक व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बीज मटका वितरण, 'एक विद्यार्थी एक वृक्ष वाटप' व 'पोस्टर प्रदर्शन' अशा विविध उपक्रमांनी पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरसचे वनपरिक्षेत्र अधिकारी दयानंद कोकरे हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. एस .बागडे हे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ.अपर्णा कुचेकर,डॉ.हनुमंत अवताडे,डॉ.विश्वनाथ आवड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सज्जन पवार उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब साळुंखे यांनी केले तर सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते व आभार डॉ.डी.जी.मगर यांनी मानले.

सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. ०७ जून २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



# 'सायकलचा वापर दररोज करा'

✔ सुराज्य/अकलूज : पर्यावरण प्रदूषण,मानवी आरोग्य व उत्तम स्वास्थ्यासाठी दैनंदिन जीवनात सायकलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देताना आपल्या दैनंदिन जीवनात सायकलींचा जास्तीत जास्त वापर करून प्रदूषण कमी करण्यास हातभार लावावा, असे मत प्राचार्य बागडे यांनी व्यक्त केले. अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आजादी का अमृत महोत्सवनिमीत्त विश्व सायकल दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे यांच्या शुभहस्ते सायकल रॅलीला सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना हिरवा झेंडा दाखवला व या रॅलीची सुरुवात झाली. ही रॅली महाविद्यालय प्रवेश द्वारापासून प्रतापसिंह चौक,सदुभाऊ चौक इथपर्यंत व परत महाविद्यालय प्रवेशद्वारा पर्यंत काढण्यात आली. या रॅलीत राष्ट्रीय सेवा योजनेतील कार्यक्रम अधिकारी डॉ.सविता सातपुते डॉ.सज्जन पवार.प्रा.डि.जे.मगर तसेच माजी कार्यक्रम अधिकारी डॉ.हणमंत अवताडे,डॉ.बाळासाहेब मुळीक,डॉ. चंकेश्वर लोंढे व महाविद्यालयातील सुमारे ५६ विद्यार्थी व प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदवला.

**संचार** सोलापूर
गुरुवार, ९ जून २०२२
संस्थापक : अप्पासाहेब काडादी संस्थापक-संपादक : रंगा वैद्य

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# मोहिते महाविद्यालयाची सायकल रॅली

संग्रामनगर, दि.८- अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 'आजादी का अमृतमहोत्सवा'निमित्त विश्व सायकल दिनाचे औचित्य साधून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. डी.एस. बागडे यांच्या या रॅलीस हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

यावेळी प्राचार्य बागडे म्हणाले, पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी सायकलचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे. यामुळे मानवी आरोग्य चांगले राहते. यावेळी त्यांनी दैनंदिन जीवनात सायकल वापराचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. या रॅलीत राष्ट्रीय सेवा योजनेतील कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते, डॉ. सज्जन पवार, प्रा. डी.जे. मगर, डॉ. हणमंत अवताडे, डॉ.बाळासाहेब मुळीक, डॉ.चंकेश्वर लोंढे व ५६ विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.



होत.
र
८- शेळगी, नटराज सुलोचना सीताराम पवार निधन झाले. त्यांच्या मुले, मुली, नातवंडे

१७
म्हाडा
हेल्पलाईन
अधिक मा

सकाळ
सोलापूर, गुरुवार, १६ जून २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

हटके

प्रणव मंत्री

# महाविद्यालयामध्ये जाताना...



महाविद्यालयामध्ये जाण्यापूर्वी लक्षात ठेवाव्या अशा काही महत्त्वपूर्ण निवडक टिप्स...

## १ नियमितपणे उपस्थित राहा

हे एका कारणास्तव क्रमांक एक आहे. कॉलेजला जाणे हा मस्त अनुभव आहे, तर नियमित महाविद्यालयात जा. लक्षात ठेवा तुमचे ध्येय पदवीधर होणे आहे. तुम्ही नियमितपणे वर्गात जाऊ शकत नसल्यास कसे चांगले गुण मिळविणार? म्हणून महाविद्यालयामध्ये नियमित उपस्थित व्हा आणि व्यवस्थितरीत्या अभ्यास करा.

## २ महाविद्यालयाची माहिती घ्या

प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वच कार्यक्रम अतिशय रोमांचक नसतात. त्याच्यात जरूर सहभाग घ्या. आपली ओळख निर्माण करा. ग्रंथालय, क्रीडा खोली, संगणक प्रयोगशाळा, शिक्षकांची खोली, इत्यादी वर्ग कुठे आहेत याची खातरजमा करा. महाविद्यालयाची संबंध माहिती असणे हे फार आवश्यक आहे. तुम्ही सामील होताच कॅम्पसशी परिचित होण्याचा प्रयत्न करा. विश्रांती आणि मोकळ्या वेळेत कॅम्पस एक्सप्लोर करा. यामुळे तुम्हाला तुमचा वर्ग शोधताना उशीर होणार नाही.

## ३ तुमच्या प्रोफेसरशी मैत्री करा

एवढ्या मुलांमध्ये प्राध्यापकाला तुमचे नाव लक्षात राहील हे जरा कठीण आहे. परंतु तुम्ही तुमच्या प्राध्यापकांशी नियमितपणे संवाद साधल्यास त्या प्राध्यापकांना तुम्हाला ओळखणे सोपे जाईल. तुमच्या प्राध्यापकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करा. तुम्ही तुमच्या प्राध्यापकांकडून भरपूर ज्ञान मिळवू शकता. त्यांचे अनुभव तुमच्या शिक्षणाचा शोध घेण्यास मदत करतील.

## ४ खूप उशीर होण्यापूर्वी मदतीसाठी विचारा

महाविद्यालये साधारणपणे चांगली ठिकाणे असतात; तुम्हाला वाईट वागताना कोणीही पाहू इच्छित नाही. तुम्हाला वर्गात त्रास होत असल्यास, तुमच्या प्रोफेसरला मदतीसाठी विचारा किंवा शिकवणी केंद्रात जा. तुम्हाला जुळवून घेण्यात अडचण येत असल्यास, समुपदेशन केंद्रातील कोणाशी तरी बोला. मोठ्या समस्येचे निराकरण करण्यापेक्षा लहान समस्येचे निराकरण करणे जवळजवळ नेहमीच सोपे असते.

## ५ चांगले मित्र बनवा

महाविद्यालय हे एक ठिकाण आहे जिथे तुम्हाला विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीचे अनेक विद्यार्थी आढळतील. प्रत्येक व्यक्तीची विचार प्रक्रिया आणि मत भिन्न असेल. तुम्हाला सकारात्मक स्पंदने देतात आणि ज्यांची मानसिकता तुमच्यासारखीच असते अशा लोकांशी चांगले संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करा. चांगली मैत्री वाढवण्याचा प्रयत्न करा.

## ६ नेतृत्व करण्यासाठी सहभागी व्हा

नेतृत्व करण्यासाठी सहभागी व्हा! तुमची प्रतिभा आणि क्षमता दाखवण्यासाठी महाविद्यालय हा सर्वोत्तम काळ आहे. जाणून घेण्यासाठी आणि प्रतिसाद देण्यासाठी झटपट व्हा. पुढाकार घ्या, जबाबदारी घ्या. नवीन नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्याचा प्रयत्न करा. तुमचे नेतृत्वगुण विकसित करा आणि एक चांगला संघ खेळाडू देखील बना.

## ७ व्यायामाचे अनुसरण करा

मला माहीत आहे की प्रयोगशाळा, अभ्यास, परीक्षा आणि क्रियाकलापांमध्ये किती व्यस्त असू शकते, परंतु व्यायाम करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे हे विसरू नका. कॅम्पसमध्ये जॉग करा किंवा कॉलेज जिममध्ये एक तास घालवून तुमचा अजेंडा 'वर्कआउट' पार करा. व्यायाम केल्याने मेंदूच्या क्रियाकलापांना चालना मिळेल, तुमची स्मरणशक्ती वाढेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्हाला एक नवी ऊर्जा मिळेल.

## ८ योग्य संतुलन ठेवा

अभ्यास करणे आणि मजा करणे हे दोन्ही विद्यार्थ्यांच्या अनुभवाचे भाग आहेत, परंतु समान संतुलन साधण्याचा प्रयत्न करा. महाविद्यालयीन जीवन मजेदार आणि रोमांचक असेल परंतु दोघांमधील योग्य संतुलन तुम्हाला मदत करेल. तुम्ही एक नवीन दिनक्रम आखाल, नवीन मित्र बनवाल, नवीन वेळापत्रक तयार कराल आणि महाविद्यालयीन जीवनातील प्रत्येक गोष्टीचा अनुभव घ्याल. स्वतःला थोडा वेळ देणे आणि त्यानुसार गोष्टींचे नियोजन करणे देखील महत्त्वाचे आहे. अभ्यास आणि विश्रांती यामध्ये योग्य संतुलन ठेवा.

## ९ उपलब्ध प्रत्येक संधी घ्या

महाविद्यालयामध्ये फक्त कोर्स वर्क करण्यापेक्षा एक्सप्लोर करण्यासारखे बरेच काही आहे. तुमचा महाविद्यालयीन अनुभव अधिक चांगला बनवण्यासाठी नवीन संधींसाठी खुले व्हा. प्रत्येक महाविद्यालय सामाजिक/अभ्यासक्रमात किंवा शैक्षणिक संदर्भात चांगल्या संधी प्रदान करते. महाविद्यालयीन जीवन नवीन गोष्टी करून पाहण्यासाठी असते, मग ते क्रीडा संघात सामील होणे, समाजासाठी साइन अप करणे, स्वयंसेवा योजनेत भाग घेणे किंवा परदेशी भाषा शिकणे असो.

## निष्कर्ष...

महाविद्यालय हे एक असे ठिकाण आहे जिथे आपण सर्वोत्कृष्ट आठवणी बनवतो. अधिक एक्सप्लोर करा, आनंदी राहा आणि उत्कृष्ट आठवणी बनवा, कारण तुम्हाला हा काळ नेहमी स्मरणात असेल. या टिपांचे व्यवस्थित अनुसरण करा आणि तुमचे भविष्य उज्ज्वल करा.

जनमत सर्वसामान्यांचे

शनिवार, ०९ जुलै २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्रा.सुधा बनसोडे यांचे न्यूयॉर्क अमेरिका येथे व्याख्यान

संग्रामनगर दि.०८ (प्रतिनिधी)– अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्राणी शास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.सुधा बनसोडे (गायकवाड) यांचे न्यूयॉर्क अमेरिका येथे व्याख्याचे आयोजन केले आहे.

WYN Confercnes Inc या जागतिक संस्थेचे आयोजित केलेल्या जागतिक चर्चा सत्रामध्ये कॉर्डियोलॅजी अँड कार्डियो व्हस्क्यूलार मेडिसीन या विषयावर आयोजित केलेल्या चर्चा सत्रामध्ये इफेक्ट ऑफ टेम्परेचर ऑन हार्ट या विषयावर डॉ.सुधा बनसोडे मार्गदर्शन करणार आहेत.दिनांक १४ व १५ जुलै रोजी या व्याख्यनाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ.सुधा बनसोडे यांनी यापूर्वी कॅलिफोर्निया विद्यापीठामध्ये पोस्ट डॉक्टरेट डिग्री संपादन केलेली आहे.त्याच बरोबर अॅक्डेमिक व्हिजीटर म्हणून त्यांनी अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, थायलंड,

कॅनडा,नेदरलँड,स्पेन,जपान इत्यादी देशामध्ये त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केलेले आहे.त्याच बरोबर त्यांची आतापर्यंत स्वतःची सात पुस्तके प्रकाशित झालेली असून दोन पुस्तकाचे काम चालू आहे.त्यांना आता पर्यंत उत्कृष्ट शैक्षणीक कार्याबद्दल व सामाजिक कार्याबद्दल त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



सध्या डॉ. सुधा बनसोडे जागतिक संशोधनावर जागतिक समीक्षक म्हणून कार्य करत असून विविध जागतिक जर्नल्सच्या विशेष संपादक सदस्य म्हणून काम पहात आहेत.

सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. ०९ जुलै २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# प्रा. बनसोडे यांचे अमेरिका येथे व्याख्यान

सुराज्य/अकलूज



अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्राणी शास्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुधा बनसोडे यांचे न्यूयॉर्क (अमेरिका) येथे व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

WYN Confercnes Inc या जागतिक संस्थेचे आयोजित केलेल्या जागतिक चर्चा सत्रामध्ये कॉर्डियोलॅजी अँड कार्डियो व्हस्क्यूलार मेडिसीन या विषयावर आयोजित केलेल्या चर्चा सत्रामध्ये इफेक्ट ऑफ टेम्परेचर ऑन हार्ट या विषयावर डॉ.सुधा बनसोडे मार्गदर्शन करणार आहेत. दिनांक १४ व १५ जुलै रोजी या व्याख्यनाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बनसोडे यांनी यापूर्वी कॅलिफोर्निया विद्यापीठामध्ये पोस्ट डॉक्टरेट डिग्री संपादन केलेली आहे. त्याचबरोबर अॅकॅडोमिक व्हिजीटर म्हणून त्यांनी अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, थायलंड,कॅनडा,नेदरलँड,स्पेन,जपान इत्यादी देशामध्ये त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केलेले आहे. सध्या डॉ.सुधा बनसोडे जागतिक संशोधनावर जागतिक समीक्षक म्हणून कार्य करत असून विविध जागतिक जर्नल्सच्या विशेष संपादक सदस्य म्हणून काम पहात आहेत.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

सकाळ

सोलापूर, बुधवार,
२० जुलै २०२२

५

# प्रवासवेड्या मोतीराम वाघ यांचे दुचाकीवरून भारत भ्रमण

सकाळ वृत्तसेवा

अकलूज, ता. १९ : कधी कडक उन, कधी जोराचा वारा, तर कधी कडक थंडी, अशा विचित्र हवामानाला तोंड देत दुचाकीवरुन प्रवास. कधी सरळ हायवेवरून तर कधी दऱ्या डोंगरातील एका घाटमाथ्यावरून दुसऱ्या घाटमाथ्यावर असा सुमारे साडेबारा हजार किलोमीटरचा खडतर प्रवास वयाची साठी गाठलेल्या अकलूजच्या मोतीराम वाघ यांनी पर्यावरण वाचविण्याचा संदेश देत दुचाकीवरून पूर्ण केला.

गेल्या तीन दशकांपेक्षा अधिक काळापासून अकलूजचे मोतीराम वाघ वेगवेगळ्या भागात प्रवास करीत असतात. सन १९९० मध्ये त्यांनी सायकलवरून भारत भ्रमण केले होते. जम्मू ते कन्याकुमारी असा तब्बल ११ हजार किलोमीटरचा प्रवास केवळ ९५ दिवसांत केला होता. त्यानंतर जपान, सिंगापूर व थायलंड असा परदेश प्रवासही केला. सन २०१९ ला पुन्हा सायकलवरून दक्षिण भारत करण्याचे ठरविले, परंतु, वेळेअभावी त्यांनी बुलेटवरुन दक्षिण भारत भ्रमण केवळ १२ दिवसांमध्ये केले. तर सन २०२१ मध्ये ९ राज्यांचा प्रवास १८ दिवसांमध्ये केला होता.

यावेळी त्यांनी नेपाळसह उत्तरेकडील १३ राज्यातून दुचाकीवरून भ्रमण केले असून यामध्ये अकलूजपासून धुळे, इंदूर, कोटा, मथुरा, दिल्ली, सीमला, मसुरी, यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ, लखनौ, अयोध्या, गोरखपूर, काठमांडू (नेपाळ) मधील पशुपतिनाथ मंदिर त्यानंतर हिमालयाच्या रांगेतून गंगाटोक, सिक्कीम, आसाम, दिसपूर, इटानगर, दिब्रुगड, कोहिमा, इंफाला, आयझॉल, आगरताळा, सीलाँग, जलपायगुडी, सिलिगुडी, बागडोग्रा, गंगासागर, कोलकाता, झारखंड-रांची, छत्तीसगड, रायपूर, नागपूर, वर्धा, परभणी, जिंतूर, माजलगाव मार्गे अकलूजला परत असा प्र[illegible] केला. दररोज [illegible] ते ५०० किमी अंतर पार करत सुमारे १२ हजार ५०० किमीचा त्यांनी प्रवास केला.



अकलूज, (ता. माळशिरस) : दुचाकीवरून भारत भ्रमण करणारे मोतीराम वाघ.

> जगात फक्त भारतातच विविधतेतून एकता नांदत आहे. राज्य बदलले की भाषा, वेश, राहणीमान सर्वच बदलत असून ही विविधता प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी जीवनात एकदा तरी भारत भ्रमण करणे गरजेचे आहे.
>
> -मोतीराम वाघ, अकलूज ता. माळशिरस.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 *
Library

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. १६ जुलै २०२२ 8

# साठ वर्षाच्या तरुणाची भारत भ्रमंती

## ३१ दिवसात १२ हजार ५०० कि.मी. प्रवास

सुराज्य/माळीनगर

निसर्गाची ओढ माणसाला स्वस्थ बसू देत नाही. प्रवासाने माणूस परिपक्व होतो हेही काही खोटे नाही. बागेचीवाडी-अकलूज येथील ५९ वर्षीय व्यक्तीने (तरुणाने) नुकताच ३१ दिवसांत मोटार सायकलवरती २६ राज्यांतून प्रवास केला. तो ही आपल्या १४ वर्षाच्या मुलाला बरोबर घेऊन.

मोतीराम तुकाराम वाघ हे एक निसर्गप्रेमी व प्रवासवेडे व्यक्तिमत्त्व आहे. कधी पायी तर कधी सायकलवरती. पण नियमित देशाच्या वेगवेगळ्या भागांना भेटी देऊन आपली निसर्ग ओढीची तहान भागवणारा वल्ली. वाघ यांनी सन १९९० साली ९५ दिवसांमध्ये सायकलवरून संपूर्ण भारतभर प्रवास केला. त्यानंतर जपान, सिंगापूर व थायलंड असा परदेश प्रवासही केला. सन २०१९ ला १२ दिवसांमध्ये बुलेटवरुन दक्षिणेकडील सर्व राज्ये, सन २०२१ मध्ये १८ दिवसांमध्ये ९ राज्यांचा प्रवास करून आपली निसर्ग भ्रमंतीची भूक भागवली. आपल्या बरोबर आपल्या १४ वर्षाच्या मुलालाही देश समजावा. देशातील विविध राज्यांतील




राहणीमान, लोक, वेशभूषा, भाषा समजाव्या याकरिता त्यांनी प्रवासाला नेले. प्रवासात येणाऱ्या-या अडचणी, निसर्गाची विविध रूपे लहान वयातच त्यांनी मुलाला दाखवून आपला देश किती विविधतेने नटलेला आहे हे दाखवले. १ मे २०२२ ते ३१ मे २०२२ या ३१ दिवसांत त्यांनी मुलाला सोबत घेऊन महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, बिहार, नेपाळ, सिक्कीम, पश्चिम बंगाल, आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, मेघालय, झारखंड, ओरिसा, छत्तीसगड अशा विविध राज्यांतून रोज ४०० ते ५०० कि. मी. अंतर पार केले.

सुमारे १२ हजार ५०० कि.मी.चा प्रवास केला. व्यवसायाने शेतकरी असलेल्या, साठी गाठत आलेल्या या तरुणाने (ज्येष्ठ व्यक्ती कसे म्हणावे) हजारो कि. मी. चा प्रवास केलेला पाहता तरुणांपुढे नक्कीच एक आदर्श निर्माण केला आहे.

> देश समजला पाहिजे : अनेक राज्यांनी मिळून बनलेला भारत पाहताना उरात अभिमान दाटून येतो. मनातला मी पणा गळून पडतो. देशाच्या निसर्ग संपन्नतेपुढे आपले व्यक्तिमत्व किती छोटे आहे हे कळून येते. विविध भाषांमधला गोडवा अनुभवता येतो. त्यासाठी जीवनात एकदा तरी आपला संपूर्ण देश फिरून पाहायला हवा. देश समजून घ्यायला हवा.
>
> \- मोतीराम वाघ, अकलूज.

जनसत्य

सोमवार, दि. २५ जुलै २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज सातवी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणन्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही ( सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल ) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे



कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले.

डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांधिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले.

पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओचे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी ( मेन बॅटल टँक ) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट ( एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता.

भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजंविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत.

देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणंत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या आकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!

जनसत्य

सोलापूर-उस्मानाबाद-गुलबर्गा जिल्ह्यातून एकाचवेळी वितरीत होणारे दैनिक www.dainikjansatya.com
Email : jansatya2013@gmail.com epaperdainikjansatya.com

सोलापूर-उस्मानाबाद * बुधवार, दि. २७ जुलै २०२२ * पाने : ८ * किंमत ५.००

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज सातवी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणन्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही ( सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल ) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी ( मेन बॅटल टॅंक ) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट ( एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता.



भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या आकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड, पुणे
मो.९९२२५४६२९५

सुराज्य सोलापूर
बुधवार, दि. २७ जुलै २०२२ 2

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

स्मृतिदिन


# विज्ञानेश्वराचे स्मरण

भारताचे थोर शास्त्रज्ञ, मिसाईल मॅन आणि लोकप्रिय माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आज सातवा स्मृतिदिन.

कलाम त्यांनी भारतवासीयांना स्वप्ने पाहायला शिकविले. स्वप्ने बघा, त्यांचा ध्यास घ्या आणि ते प्रत्यक्षात उतरणार याबद्दल विश्वास बाळगा ' हा मंत्र त्यांनी दिला. भारताच्या अवकाश संशोधन आणि क्षेपणास्त्र निर्मिती कार्यक्रमातील त्यांची कामगिरी अजोड आणि अतुलनीय अशी आहे. तरुण संशोधकांना हाताशी घेऊन संपूर्णतः स्वदेशी बनावटीच्या अग्नी', पृथ्वी', आकाश', नाग' आणि त्रिशूल' अशा दीर्घ पल्ल्याच्या प्रखर क्षेपणास्त्रांची निर्मिती करून भारतास क्षेपणास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्ण आणि सामर्थ्यवान बनवले. त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने, त्यांचे बलशाली, संपन्न, विज्ञाननिष्ठ आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करू या.

सुमारे १९४१ चा काळ. रामेश्वरमच्या समुद्रकिनारी दहा वर्षाचा एक छोटा मुलगा मान अवघडेपर्यंत सीगल पक्षी व बगळे आकाशात कसे भरारी घेतात, हे उत्सुकतेने पाहत असे. पक्षांच्या भरारीमागचे गूढ आपणास उकलावे आणि आपणासही त्यांच्याप्रमाणे आकाशात विहार करता यावा अशी पराकोटीची इच्छा त्यास होत असे आणि खरोखरच एक दिवस आकाशाचेच पंख करून या मुलाने अशी भरारी घेतली की सारे जग स्तिमित झाले. हा छोटा मुलगा म्हणजे डॉ.अबुल पाकीर जैनुलाबद्दीन अब्दुल कलाम, भारताचे थोर शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती होय.

डॉ. अब्दुल कलामांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तमिळनाडूतील रामेश्वरम या छोट्याश्या गावात झाला. आई आशियाम्मा आणि वडील जैनुलाबद्दीन दोघेही धार्मिक. त्यांची शिकवण, शिवाय रामेश्वरम हे तीर्थक्षेत्र असल्याने तेथील पवित्र वातावरण आणि तिथल्या शिवमंदिराचे पुजारी लक्ष्मणशास्त्री या सर्वांचे संस्कार त्यांच्या बालमनावर खोलवर रुजले. अल्पशिक्षित वडिलांच्या विचारांचा वारसा डॉ. कलामांना त्यांच्या जीवनातील मोक्याच्या प्रसंगी दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरला. ते लहानपणी शमशुद्दीन या त्यांच्या भावाला रामेश्वरममध्ये घरोघरी वर्तमानपत्रे वाटण्यास मदत करीत असत. बालपणीचे शिक्षण रामेश्वरम मध्ये पूर्ण केल्यानंतर कलामांना रामनाथपुरममधील श्वाझ हायस्कूलमध्ये श्यादुराई सालोमान हे पितृतुल्य गुरु मिळाले. त्यांनी तरुण कलामांच्या मनात स्वप्ने बघण्याचे, त्यांचा ध्यास घेण्याचे आणि आत्मविश्वासाचे बीज पेरले. त्यानंतर तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेज मधून त्यांनी पदार्थविज्ञान विषयाची पदवी घेतली व पुढे व्यावसायिक शिक्षणासाठी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मध्ये विमान-बांधणीशी संबंधित वायुगतिशास्त्र (एरोडायनामिक्स) शाखा निवडली. या ठिकाणी त्यांनी प्रा. स्पॉंडर, प्रा. पंडलाई, प्रा. नरसिंहराव, प्रा. श्रीवर्धन, आदी अनेक विद्वान गुरूंकडून विमान-बांधणीतील बारकावे आत्मसात केले. त्यानंतर वैमानिक बनण्याची संधी हुकल्यानंतर १९५८ मध्ये संशोधक पदावर असताना कलाम व त्यांच्या सहकाऱ्यांनी नंदी' या संपूर्ण भारतीय बनावटीच्या हॉवरक्राफ्टची निर्मिती केली. यामुळे त्यांची अवकाश संशोधन संस्थेत रॉकेट अभियंता म्हणून नेमणूक झाली. १९६२ मध्ये थुंबा येथे अवकाशतळ उभारणीमध्ये कलामांचा सहभाग होता. संस्थेतर्फे ते विशेष प्रशिक्षणासाठी अमेरिकेत नासा' येथे गेले. २१ नोव्हेंबर १९६३ मध्ये भारताने अवकाशात पाठविलेल्या नाईकेआपाची' या पहिल्या अंतराळयानाच्या प्रकल्पात कलामांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. याशिवाय डॉ. विक्रम साराभाईंच्या मार्गदर्शनाखाली रोहिणी या रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण २० नोव्हेंबर १९६७ ला केले तर यानंतर अल्पावधीतच रॉकेट असिस्टेड टेक ऑफ सिस्टीम' (राटो) म्हणजे एखाद्या कमी लांबीच्या धावपट्टीवर रॉकेटच्या साहाय्याने लढाऊ विमानांना अपेक्षित वेग देण्याचे तंत्र विकसित केले. १९६९ मध्ये साराभाईंनी त्यांच्यावर उपग्रह प्रक्षेपक वाहनाच्या (एसएलव्ही) निर्मितीमधील महत्त्वाची जबाबदारी सोपविली.या दरम्यान त्यांच्यावर अनेक कौटुंबिक संकटे (मेहुणा व मित्र जलालुद्दीन चे निधन) कोसळली. तथापि, त्यांनी एस.एल.व्ही. चे चारही टप्पे कार्यरत करून रोहिणी उपग्रहाला योग्य कक्षेत पाठविण्यात यश मिळविले. भारतीय संसदेने व तत्कालीन पंतप्रधान इंदिराजींनी त्यांचे अभिनंदन केले. एस.एल.व्ही.च्या यशानंतर क्लामांच्यावर भारताचे पहिले क्षेपणास्त्र तयार करण्याची जबाबदारी सोपविली. जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे पृथ्वी','त्रिशूल', आकाशातून जमिनीवरील लक्षाचा वेध घेणारे 'आकाश' , रणगाडा उद्ध्वस्त करणारे नाग' आणि आंतरखंडीय अग्नी' या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीमध्ये कलामांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. क्षेपणास्त्रनिर्मितीने भारताच्या सामर्थ्याची सर्व जगाला जाणीव झाली आणि क्षेपणास्त्रसज्जतेमुळे भारताचा जगात दबदबा वाढला. तरुणांना प्रेरित करण्यासाठी त्यांनी अग्निपंख' हे आत्मचरित्र, तर



तरुणांचे देशप्रेम जागविण्या साठी 'इग्नायटेड माइंड' हे पुस्तक लिहिले असून दि लाइफ ट्रि' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. अकरावे राष्ट्रपती म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी देशाला २०२० मध्ये जागतिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न दिले. त्याकरिता विविध क्षेत्रात गाठावयाच्या उद्दिष्टांचा पुस्तकरूपी अहवाल इंडिया २०२०' उपलब्ध आहे. डॉ. कलामांना अनेक पुरस्कार मिळाले असून देश व परदेशातील अनेक संस्थांचे ते सन्माननीय सदस्य होते. सुमारे ३० महत्त्वाच्या विद्यापीठांनी त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स' , डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी', डॉक्टर ऑफ लिटरेचर' सारख्या मानाच्या पदव्या दिल्या आहेत. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण (१९८१), पद्मविभूषण (१९९०) आणि भारतरत्न' (१९९७) या सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी गौरविले आहे. आयुष्यभर विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम करणाऱ्या कलामांना आपल्या देशातील तरुणांच्या बद्दल खूप विश्वास होता. म्हणूनच त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन आदी विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासवृत्ती निर्माण करणारे उपक्रम आयोजित करून त्यांचे स्मरण केले पाहिजे.

- प्रा. विजय कोष्टी

सकाळ TODAY
सोलापूर, सोमवार, १ ऑगस्ट २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

जाहिरात

# भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजुरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नवीन मंजुरीचे आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पद्धतीने नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवरून (एन.एस.पी.) मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत.** नवीन मंजुरीसाठी केंद्र शासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

नवीन मंजुरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी SSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०th Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फत केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची (SSC) बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| अ. क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक<br>नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३१ ऑक्टोबर, २०२२ |
| २ | महाविद्यालयाने अर्जांची ऑनलाईन पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक | १५ नोव्हेंबर, २०२२ |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करून त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करून पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तत्काळ फॉरवर्ड करावेत.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी www.scholarships.gov.in हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणाऱ्या Helpline No. ०१२०-६६१९५४० या क्रमांकावर किंवा helpdesk@nsp.gov.in या ई मेल वरून संपर्क साधावा. तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०- २६१२६९३९/ २९७०७०९८ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या नवीन सूचनांसाठी या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in व www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

(सदर शिष्यवृत्तीबाबतचे सविस्तर परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल.)

**डॉ. धनराज माने**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

डी.जी.आय.पी.आर. २०२२-२३/C२२१६

---

महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

जाहिरात

# केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३

राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन या अल्पसंख्याक समाजातील गुणवान विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०२२-२३ साठी ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) शिष्यवृत्तीचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्ज स्वीकारले जातील. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

❖ **अल्पसंख्याक शिष्यवृत्ती सन २०२२-२३ ऑनलाईन अर्ज भरण्याचे वेळापत्रक :**
नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याचा **अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२** आहे व महाविद्यालयाने अर्जाची ऑनलाईन पडताळणी करण्याचा **अंतिम दिनांक १५ नोव्हेंबर २०२२** अशी आहे.

❖ **किमान पात्रता व अटी :**
१. अर्जदार हा अल्पसंख्याक समाजातील असला पाहिजे. (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन)
२. अर्जदार हा भारतातील **Government/Private University/ Institute/ College** मध्ये शिकत असलेला असावा.
३. विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.
४. विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

❖ **अर्जदारांसाठी सूचना :**
१. अर्जदार हा National Scholarship Portal **(www.scholarship.gov.in)** या संकेतस्थळावरील कोणत्याही एकाच शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतो.
२. ऑनलाईन अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया व शिष्यवृत्तीबाबतची माहिती Frequently Asked Question (FAQ)NSP पोर्टलच्या Home page वर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.
३. विद्यार्थ्यांचा बँक खाते क्रमांक चालू स्थितीत असणे (Operative/ Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रकमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

❖ **महाविद्यालये/विद्यापीठे व संस्थांसाठी सूचना**
१. सन २०२१-२२ मध्ये ज्या महाविद्यालये, विद्यापीठे व संस्था (अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे संख्या असणारे) यांनी त्यांची KYC व आधार डेमो- ऑथेंटिकेशनसह स्वतःची नोंदणी केलेली नाही त्या सर्व महाविद्यालये, विद्यापीठे व संस्था यांनी त्यांची KYC ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या नवीन प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी **www.scholarships.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे अवलोकन वेळोवेळी करावे. तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ येथे **दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९/२९७०७०९८** या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा अथवा **schol.dhepune@gov.in** या ई-मेलवर मेल करावा. **(NSP Portal Toll Free Number १८००-११-२००१)**

सदर शिष्यवृत्तीबाबतची सविस्तर परिपत्रक संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल.

**डॉ. धनराज माने**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

डी.जी.आर.पी.आर. २०२२-२३/C २२१५

सुराज्य
सोलापूर
मंगळवार, दि. ०२ ऑगस्ट २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

✓ सुराज्य/अकलूज : अकलूज येथे शंकरराव मोहिते महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात करण्यात आला.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून दलित, उपेक्षित, शोषित, वंचित, कामगार घटकांतील समाजाला नायकत्व बनवून साहित्यामध्ये त्यांचा प्राधान्याने विचार करून, अन्यायाच्या विरुद्ध बंड करण्याची भाषा केली, असे मत कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी समारंभ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांचा १८ व्या वर्धापन दिनी कार्यक्रमात मनोगत व्यक्त केले.

डॉ. दत्तात्रय बागडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा मनोगतातून घेतला. त्याचबरोबर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लोकमान्य टिळक यांच्या विचारांचे स्मरण केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ज्युनिअर विभागाचे प्रा. आर. के. इंगोले, डॉ. हनुमंत अवताडे, डॉ. अपर्णा कुचेकर, डॉ. विश्वनाथ आवड, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक वृंद उपस्थित होता. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जनार्दन परकाळे यांनी केले.

जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार, ०२ ऑगस्ट २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा



संग्रामनगर दि.१ (प्रतिनिधी)- अकलूज येथे शंकरराव मोहिते महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती,लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात करण्यात आला.

'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून दलित,उपेक्षित,शोषित,वंचित, कामगार घटकांतील समाजाला नायकत्व बनवून साहित्यामध्ये त्यांचा प्राधान्याने विचार करून,अन्यायच्या विरुद्ध बंड करण्याची भाषा केली असे मत कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे वतीने आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी समारंभ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांचा १८ वा वर्धापन दिनी कार्यक्रमात मनोगत व्यक्त केले.

डॉ.दत्तात्रय बागडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा आपल्या मनोगतातून घेतला.त्याचबरोबर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लोकमान्य टिळक यांच्या विचारांचे स्मरण केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील जुनिअर विभागाचे प्राध्यापक आर.के.इंगोले,डॉ. हनुमंत अवताडे,डॉ.अपर्णा कुचेकर,डॉ. विश्वनाथ आवड,कार्यालयीन अधिक्षक युवराज मालुसरे तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक वृंद उपस्थित होता.

या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जनार्दन परकाळे यांनी केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# सर्वांनी संघटित प्रयत्न करावेत : मोहिते-पाटील

## बार्शीत उच्चशिक्षण संस्थाचालक, सेवाभावी संस्थांची सहविचार सभा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

उच्चशिक्षण संस्थांसमोर बदलत्या काळात निर्माण झालेल्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी, उच्चशिक्षण संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व संस्थाचालकांनी संघटितपणे प्रयत्न केले तरच हे प्रश्न लवकर सुटू शकतात, असे मत उच्चशिक्षण संस्थाचालकांची सेवाभावी संस्था, सोलापूरच्या अध्यक्ष पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलात आयोजित जिल्ह्यातील उच्चशिक्षण संस्थाचालकांची सेवाभावी संस्था व प्राचार्य यांच्या सहविचार सभेत त्या बोलत होत्या. अलीकडच्या काळात उच्चशिक्षण संस्थाचालकांसमोर शिक्षक पदभरती, वेतनेतर अनुदान, नवीन शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीतील त्रुटी, मुक्त विद्यापीठामुळे पारंपरिक अभ्यासक्रमांच्या 'महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येचे निर्माण झालेले प्रश्न आदींबाबत मोहिते-पाटील यांनी विवेचन केले. याप्रसंगी उच्चशिक्षण संस्थाचालकांच्या सेवाभावी संस्थेचे कार्याध्यक्ष बाबुराव गायकवाड, सहसचिव दशरथ गोप, खजिनदार मनोहर सपाटे, बळीराम साठे, डॉ. बी.वाय. यादव आदी विचारमंचावर उपस्थित होते.



बार्शी : सहविचार सभेत बोलताना डॉ. बी. वाय. यादव.

प्रास्ताविक प्रकाश पाटील यांनी केले. दशरथ गोप यांनी सभेपुढील विषयपत्रिकेचे वाचन केले. महाराष्ट्र राज्य प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख यांनी सद्यपरिस्थितीत उच्चशिक्षणात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची तपशीलवार मांडणी केली. डॉ. बी. वाय. यादव यांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी स्थापन केलेल्या संस्थेची शैक्षणिक आणि आरोग्यविषयक वाटचाल मांडली.

सहविचार सभेत बाबुराव गायकवाड, दशरथ गोप, मनोहर सपाटे, माजी आमदार विनायक पाटील, विलास घुमरे, नंदन जगदाळे, पी.टी. पाटील, प्राचार्य भारती रेवडकर, प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदींनी विषयपत्रिकेवरील विषयांच्या अनुषंगाने सकारात्मक चर्चा केली. नंदन जगदाळे, जयकुमार शितोळे, अरुण देबडवार, संस्थेचे सदस्य उपस्थित होते. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. भारती रेवडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

सुराज्य सोलापूर



राष्ट्रीय ग्रंथपाल दिन

# आभासी ग्रंथालये वाढवावित



पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथनजींची जयंती देशात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरी केली जाते. ग्रंथालय क्षेत्रात बरीच प्रगती झाली आहे पण आज जर आपण आपल्या आजूबाजूच्या ग्रंथालयाकडे पाहिले तर आपल्याला प्रश्न पडतो की हे इतके मागास का आहेत? एकीकडे, आपण दर्जेदार शिक्षण व्यवस्थेकडे जाण्याचा प्रयत्न करत आहोत, दुसरीकडे, आपणच शिक्षणाचा मुख्य केंद्र अर्थात ग्रंथालयांच्या विकासाकडे दुर्लक्ष करीत आहोत. याच विषयावर युनिकोड फाईलसह एक विशेष लेख आपणास पाठवत आहे, कृपया हा लेख स्वीकारावे, ही आपल्याला नम्र विनंती, आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

प्रत्येक शिक्षण केंद्रामध्ये ग्रंथालये हे ज्ञानाचे मुख्य स्रोत असते. ग्रंथालय हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे, जे शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यापासून ते आयुष्याच्या शेवटपर्यंत माणसाला साथ देऊन आणि खरा मार्गदर्शक बनून प्रगतीच्या मार्गावर पुढे जाण्यासाठी सतत प्रोत्साहन देते. ग्रंथालये जीवन कौशल्ये सुलभ करून शिक्षणाच्या संधी निर्माण करतात, साक्षरता आणि शिक्षणास समर्थन देतात, नवीन कल्पना आणि दृष्टिकोनांना आकार देऊन सर्जनशील आणि नावीन्यपूर्ण समाज निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. संस्कृतीचे समर्थन करून निरोगी समुदाय तयार करते, हे कुतूहल आणि टीकात्मक विचारांना देखील प्रोत्साहन देते. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाच्या इष्ट सवयींचे समर्थन करते. ग्रंथालय हे खरे तर अध्यापन आणि शिकण्याच्या प्रक्रियेचा एक भाग आहे. जगाच्या प्रत्येक क्षेत्रातील संसाधनांमध्ये मुक्त प्रवेश प्रदान करून वाचकांना वस्तुस्थितीची माहिती देण्यात ग्रंथालय मदत करतात. फक्त एकच गोष्ट जे आपल्याला पूर्णपणे जाणून घ्यावचे आहे ते म्हणजे ग्रंथालय. ग्रंथालयाचे शोध करण्यापेक्षा जगात आनंददायी काहीही नाही. शतकानुशतके शिक्षण, माहिती, इतिहास आणि सत्याचा संग्रह करणारी ग्रंथालये चुकीच्या माहितीपासून बचाव करणारे महत्त्वाचे रक्षक आहेत. ग्रंथालयात खर्च करणे हा ज्ञान वाढवण्याचा उत्तम मार्ग आहे.

देशातील ग्रंथालय माहिती शास्त्राचे जनक मानले जाणारे पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथनजी यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

देशाचे माननीय सरन्यायाधीश एन व्ही रामण्णा यांनी हैदराबाद येथे एका कार्यक्रमादरम्यान सांगितले की, राज्य सरकारांनी हे सुनिश्चित करायला हवे की प्रत्येक शाळा, महाविद्यालयात ग्रंथालय आणि खेळाचे मैदान असायलाच पाहिजे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा विकास होईल. पुस्तक वाचणे ही एक चांगली सवय आहे कारण ती मुलांच्या मनावर छाप सोडते. जेव्हा की खेळ खेळताना मुलांमध्ये खिलाडूवृत्ती वाढेल. देशातील ग्रंथालयांमध्ये कुशल कर्मचाऱ्यांची अतिशय कमतरता असून दुसरीकडे या क्षेत्रातील कुशल उच्च शिक्षित वर्गामध्ये बेरोजगारी शिखरावर आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीच ग्रंथालयात योग्य व्यवस्थापन आणि वाचकांना उत्तम सेवा देऊ शकतो, परंतु देशातील अनेक राज्यांमध्ये शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये आणि इतर विभागांमध्ये अनेक वर्षांपासून नवीन कर्मचारी भरती होत नाही. केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय, आर्मी स्कूल प्रमाणे इतर शैक्षणिक संस्था सतत कुशल कामगारांची भरती करत नाहीत. कर्मचारी सेवानिवृत्त होतात पण नवीन कर्मचारी येत नाहीत, अनेक ठिकाणी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या आधारे ग्रंथालये सुरू आहेत, अनेक ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचे पगार अत्यंत कमी आहेत, तर अनेकदा त्यांना महिनो न महिने पगारही मिळत नाही. एकीकडे आपण शिक्षणाचा प्रसार करत आहोत तर दुसरीकडे ग्रंथालयांच्या विकासाकडे दुर्लक्ष करत आहोत. वाचकांसाठी अत्याधुनिक संसाधने तर दूर अनेक ग्रंथालयांमध्ये मूलभूत ग्रंथालयीन सेवाही नाहीत. देशातील हजारो ग्रंथालये आपल्या अस्तित्वाची शेवटची लढाई लढत आहेत अर्थात पुरेशा निधीअभावी आणि उत्तम व्यवस्थापनाअभावी अनेक ग्रंथालये नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, अनेक ग्रंथालयांमध्ये पुरेशी टेबल, खुर्च्या, पंखे, लाइट, पिण्याचे पाणी, शौचालय, वीजही नाही आणि ग्रंथालयाच्या इमारतीच्या खिडक्या, दरवाजे, भिंती कमकुवत झाल्या आहेत. पावसात छतावरून पाणी टपकते. ग्रंथालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे मौल्यवान पुस्तकांचे कधीही भरून न येणारे नुकसान होते. मौल्यवान दुर्मीळ हस्तलिखिते धुळीच्या जाड्यात झाकलेली आहेत. अशा परिस्थितीमुळे अनेक वाचक सार्वजनिक ग्रंथालयांपेक्षा खासगी ग्रंथालयांना प्राधान्य देतात.

ग्रंथालय हा शिक्षण व्यवस्थेचा पाया आहे, ती सुविधा नसून विद्यार्थ्यांची मूलभूत गरज आहे, ती पूर्ण करण्यासाठी देशाच्या ग्रामीण भागात शालेय ग्रंथालये स्थापन करण्याची नितांत गरज आहे. आरटीई कायदा २०१० चे कलम १९ भारतातील प्रत्येक शाळेत ग्रंथालय स्थापन करण्यास समर्थन देते. तरीही, ग्रामीण भागातील सुमारे २१.९ टक्के शाळा ग्रंथालयाशिवाय आहेत. भारतासाठी युनेस्कोच्या शैक्षणिक स्थिती अहवाल २०२१ नुसार, देशातील १ लाख शाळा फक्त १ शिक्षक चालवतात. शाळांमध्ये एकूण ११.१६ लाख पदे रिक्त आहेत, त्यापैकी ६९ टक्के ग्रामीण भागात आहेत. विशेष शिक्षण, संगीत, कला आणि शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही माहिती नाही आणि शालेय ग्रंथालये आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांची तरतूद तुटपुंजी आहे. ७० टक्के विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये शिकतात. आपल्याला शाळेत ११ लाखांहून अधिक पात्र शिक्षकांची नितांत गरज आहे. देशातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या पायाभूत सुविधांची दुरवस्था झाली आहे आणि सर्वात दुर्लक्षित व कमी वित्तपुरवठा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, प्रत्येक ११,५०० लोकांमागे एक ग्रामीण ग्रंथालय आणि ८०,००० पेक्षा जास्त लोकांसाठी एक शहरी ग्रंथालय आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन ॲन्ड इन्स्टिट्यूशन्स (इफ्ला) च्या मानकांनुसार, प्रत्येक ३००० लोकांमागे एक सार्वजनिक ग्रंथालय असावे आणि अशा प्रकारे आज देशाला ५,००,००० सार्वजनिक ग्रंथालय युनिट्सची गरज आहे.

परदेशात ग्रंथालयांच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे. आभासी ग्रंथालयांचे जाळे सर्वत्र पसरलेले आहे आणि ग्रंथालय सेवेसाठी प्रति व्यक्ती प्रचंड पैसा खर्च केला जातो. युनायटेड स्टेट्समध्ये सार्वजनिक ग्रंथालयांवर दरडोई खर्च अंदाजे ३५.९६ डॉलर आहे. 'पब्लिक लायब्ररी इन द युनायटेड स्टेट्स' वर जाहीर केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार, २०१३ सालासाठी, सार्वजनिक ग्रंथालयांवर एकूण परिचालन खर्च १०.९ डॉलर अब्ज होता, आणि १.२ डॉलर अब्ज संकलनावर खर्च झाला होता. प्रति १००० लोकांमागे पुस्तकांची सरासरी संख्या २५४१.९ होती. त्या तुलनेत आपण खूप मागासलेले दिसतो. ग्रंथालयात दरडोई सेवेसाठी आपण एक टक्काही खर्च करत नाही. आयआयटी, आयआयएम, एम्स यांसारख्या आपल्या देशातील केंद्रीय संस्थांची ग्रंथालये किंवा काही मोठ्या खाजगी संस्थांची ग्रंथालये विकसित झालेली दिसतात. शहराने आता महानगराचे रूप धारण केल्याने वाढत्या लोकसंख्येनुसार ग्रंथालयांची संख्याही वाढत नाही. हे गांभीर्य सरकार आणि संस्थांनी लवकर लक्षात येणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रंथालय असले पाहिजे जेणेकरून त्या जिल्ह्यातील सर्व शहरे आणि गावातील सर्व ग्रंथालये त्याच्याशी पूर्णपणे जोडली जावीतशहरातील प्रत्येक प्रभागात ग्रंथालये ग्रंथालयात आजची गुंतवणूक उद्याच्या विकासाचा स्वरूपात नफा आहे.

- डॉ. प्रितम गेडाम.

सुराज्य
सोलापूर
मंगळवार, दि. २३ ऑगस्ट २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# मोहिते महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीवर कार्यशाळा

✔ सुराज्य/अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक सत्यजीत चव्हाण यांनी पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेत एकूण ३९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या कार्यशाळेच्या उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. बागडे म्हणाले की, सध्या पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत चालला आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस व विविध रासायनिक रंगाचा वापर केलेल्या मूर्ती विसर्जित केल्यानंतर पाण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. हे टाळण्यासाठी अशा पर्यावरण पूरक मूर्ती बनवणे ही काळाची गरज आहे. या कार्यशाळेला सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ आवड, विभागीय समन्वयक डॉ. चंकेश्वर लोंढे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते, डॉ. सज्जन पवार व कार्यालयीन अधिक्षक युवराज मालुसरे उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक समाधान शेंडगे यांनी सूत्रसंचलन केले तर प्रकाश भोसले यांनी आभार मानले.

जनमत
सर्वसामान्यांचे
संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे
मंगळवार २३ ऑगस्ट २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *



## शंकरराव मोहिते महाविद्यालयात पर्यावरण पूरक गणेशमूर्ती निर्मितीवर आधारित एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

संग्रामनगर दि.२२ (प्रतिनिधी)– शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक सत्यजित चव्हाण यांनी पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले.या कार्यशाळेत एकूण ३९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेच्या उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना डॉबागडे म्हणाले की,सध्या पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत चालला आहे.प्लास्टर ऑफ पॅरिस व विविध रासायनिक रंगाचा .वापर केलेल्या मूर्ती विसर्जित केल्यानंतर पाण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. हे टाळण्यासाठी अशा पर्यावरण पूरक मूर्ती बनवणे ही काळाची गरज आहे. या कार्यशाळेला सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ आवड,विभागीय समन्वयक डॉ.चंकेश्वर लोंढे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सविता सातपुते,डॉ.सज्जन पवार व कार्यालयीन अधिक्षक युवराज मालुसरे उपस्थित होते.ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक समाधान शेंडगे यांनी सूत्रसंचलन केले तर प्रकाश भोसले यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
SMART
बुधवार,२४ ऑगस्ट २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात गणेशमूर्ती निर्मितीवर कार्यशाळा

अकलूज / प्रतिनिधी

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २२ ऑगस्ट रोजी संपन्न झालेल्या या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक सत्यजित चव्हाण यांनी पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेत एकूण ३९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. कार्यशाळेच्या उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी केले. याप्रसंगी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.विश्वनाथ आवड, विभागीय समन्वयक डॉ.चंकेश्वर लोंढे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सविता सातपुते, डॉ.सज्जन पवार व कार्यालयीन अधिक्षक युवराज मालुसरे यांनी गणेशमूर्ती निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.दत्तात्रय मगर यांनी केले. स्वयंसेवक समाधान शेंडगे यांनी सूत्रसंचलन केले तर प्रकाश भोसले यांनी आभार मानले.

सकाळ

सोलापूर, मंगळवार,
६ सप्टेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# मोहिते महाविद्यालयात माने यांचे व्याख्यान

**अकलूज, ता. ५ :** शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ''एनएसएस आणि अभ्यास'' या विषयावर दिल्लीच्या राजपथावरील संचलनात महाराष्ट्राचे नेतृत्व केलेल्या राजश्री माने यांचे व्याख्यान झाले.

त्या म्हणाल्या, यशस्वी होण्यासाठी व्यक्तिमत्व विकासाची गरज असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमातून सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होत असल्याने विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमात सहभागी होणे गरजेचे आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर ताटे-देशमुख यांनीही मार्गदर्शन केले.

सुराज्य सोलापूर

सोमवार, दि. २६ सप्टेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *



# हिंदी भाषेतून रोजगाराच्या व्यापक संधी : डॉ. पवार

✔ सुराज्य/अकलूज : हिंदी भाषेचा सर्वांगिण अभ्यास केला तर लेखक, कवी, अनुवादक, सिनेमा क्षेत्र, पत्रकारिता क्षेत्र अशा विविध क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते. भाषा विचारांचे संप्रेषण करते. त्यामुळे कोणतीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. यातून रोजगाराच्या संधी मिळतात, असे प्रतिपादन अइंदापूर येथील आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाच्या हिंदी विभाग प्रमुख डॉ सीताबाई पवार यांनी केले. अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात हिंदी दिवस निमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या एम. ए. हिंदी गुणवत्ता यादीमध्ये प्रथम क्रमांक आणि सुवर्ण पदक पटकावणारा विभागाचा विद्यार्थी विनोद मोहिते तसेच त्याचे शेत मजूरी करणारे आई-वडील शहाजी मोहिते व सौ. साळूबाई मोहिते यांचाही सत्कार याप्रसंगी करण्यात आला. या कार्यक्रमाला हिंदी विभाग प्रमुख डॉ. अपर्णा कुचेकर, प्रा. निवृत्ती लोखंडे, डॉ. बाळासाहेब मुळीक, प्रा. दादासाहेब कोकाटे प्रा. स्मिता पाटील, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सलिम शेख आणि सुरेश बनपट्टे, नदाफ, गणपत लोंढे, पोतदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन बी. ए. भाग एकच्या विद्यार्थ्यांनी केले. प्रास्ताविक राजू धनवडे याने, आभार प्रदर्शन संतोष सर्मिदर याने तर सुत्रसंचलन रेखा कारंडे हिने केले.

सकाळ » TODAY

सोलापूर, गुरुवार,
२९ सप्टेंबर २०२२

# 'सिनेट'च्या 'पदवीधर'साठी चुरशीने ४८.३७ टक्के मतदान

## आज सकाळी दहापासून मतमोजणी

सोलापूर, ता. २९ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट, विद्यापरिषद आणि अभ्यास मंडळाच्या विविध ३८ जागांसाठी गुरुवारी (ता. २९) मोठ्या उत्साहात आणि शांततेत मतदान झाले. पदवीधर मतदारसंघासाठी ४८.३७ टक्के, विद्यापीठ शिक्षकसाठी १०० टक्के तर शिक्षक मतदारसंघासाठी ९७.३८ टक्के चुरशीने मतदान झाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट)साठी शहर- जिल्ह्यातील १६ केंद्रांवर मतदान झाले. सकाळी नऊ ते दुपारी चार या वेळेत शहरातील संगमेश्वर, दयानंद आणि वालचंद महाविद्यालयाच्या केंद्रांवर रांगा लावून मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. सकाळच्या सत्रात महिला मतदारांनी देखील रांगा लावत आपला मतदानाचा हक्क बजावला. दुपारी १२ ते दोन या वेळेत मतदान केंद्रांवर मतदानासाठी मोठी गर्दी झाली होती. त्यानंतर हळूहळू गर्दी ओसरली. सायंकाळच्या सुमारास पुन्हा गर्दी दिसून आली.

सकाळी संगमेश्वर महाविद्यालयाच्या केंद्राला कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या स्वतः भेट देऊन मतदान केंद्रांची पाहणी केली व परिस्थिती जाणून घेतली. 'पदवीधर'मधून आठ हजार ६७४ पैकी चार हजार १९६ असे सर्वांत कमी मतदान झाले. तुलनेने इतर मतदारसंघांसाठी मतदान मोठ्या प्रमाणात झाले. सर्वाधिक मतदान विद्यापीठ शिक्षक १०० टक्के, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ १०० टक्के, प्राणिशास्त्र १०० टक्के व शैक्षणिक मूल्यमापन अभ्यास मंडळासाठी १०० टक्के मतदान झाले.

उद्या (शुक्रवारी) सकाळी १० वाजता विद्यापीठात मतमोजणीला सुरवात होणार आहे. पसंतीक्रमानुसार मतपत्रिकेवर मतदान झाल्याने निकाल

पान ७ वर »



सोलापूर : संगमेश्वर महाविद्यालयात लागलेली मतदारांची रांग.

# सिनेटच्या 'पदवीधर'साठी चुरशीने ४८.३७ टक्के मतदान

» पान १ वरून

हाती येण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे. मतमोजणीसाठी कोटा पद्धत अवलंबिण्यात येतो. त्यामध्ये 'पदवीधर'साठी अधिक मतदान असल्याने मतमोजणीला विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शुक्रवारी रात्री उशिरा अथवा शनिवारी सकाळी सर्व मतदारसंघांतील निकाल जाहीर होण्याची शक्यता विद्यापीठ प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

### अकलूजमध्ये मतदान

अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत संस्था प्रतिनिधी व शिक्षकसाठी १०० टक्के मतदान झाले असून, पदवीधरसाठी ४७.४५ टक्के मतदान झाले आहे. या मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी संस्था प्रतिनिधी म्हणून अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील, उपाध्यक्षा शीतलदेवी मोहिते-पाटील, प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

या महाविद्यालयाच्या मतदान केंद्रासाठी उत्तम राक्षे हे मतदान केंद्राध्यक्ष तर मंगेश गोवर्धन यांनी मतदान अधिकारी म्हणून काम पाहिले. तर मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाचे नाना साठे व सुरेश बनपट्टे यांनी मतदान अधिकारी म्हणून काम पाहिले.

### मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे

| मतदारसंघ | एकूण मतदान | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| विद्यापीठ शिक्षक | २२ | २२ | १०० |
| संस्था प्रतिनिधी | ५५ | ५३ | ९६.३ ६ |
| शिक्षक | ९५७ | ९३२ | ९७ .३८ |
| पदवीधर | ८६७४ | ४१९६ | ४८.३७ |
| रसायनशास्त्र अभ्यास मंडळ | १४ | १४ | १०० |
| प्राणिशास्त्र अभ्यास मंडळ | ९ | ९ | १०० |
| इंग्रजी अभ्यास मंडळ | २९ | २८ | ९६.५ ५ |
| शैक्षणिक मूल्यमापन | ८ | ८ | १०० |

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. २९ सप्टेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101




## शंकरराव मोहिते महाविद्यालयात गांडूळ खत निर्मितीवर कार्यशाळा

✔ **अकलूज** : जमिनीचे आरोग्य उत्तम राखण्याचे महत्त्वाचे काम गांडूळ करतो, असे प्रतिपादन प्रा. रामलिंग सावळजकर यांनी केले. अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यप्रसिद्धी सप्ताहा अंतर्गत वर्मी कंपोस्टवर आधारित कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे हे होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. सविता सातपुते व डॉ. सज्जन पवार उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, आधुनिक युगात रासायनिक खते व फवारण्यामुळे जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यासाठी गांडूळ खताचा वापर केला तर जमिनीची सुपीकता वाढून पिकांची चांगली वाढ होते, व पर्यायाने उत्पादनही वाढते. यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना डॉ.दत्तात्रय बागडे म्हणाले की, अलीकडच्या काळात गांडूळ खत हा उद्योग म्हणून ही पुढे येत आहे व त्यातून आर्थिक प्रगती करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सज्जन पवार यांनी केले. स्वयंसेविका प्राची शिंदे हिने आभार मानले .तर स्नेहल मगर हिने सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101



# सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सिनेटसाठी १०० टक्के मतदान

संग्रामनगर दि.२९ (प्रतिनीधी)– शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सिनेटसाठी प्रतिनीधी, संस्था प्रतिनिधी,शिक्षक व पदवीधर तसेच विविध अभ्यास मंडळे यांचे निवडी करता आज मतदार झाले.या मतदान केंद्रामध्ये संस्था प्रतिनिधी तसेच शिक्षक सिनेटसाठी १०० टक्के मतदान झाले असून पदवीधर सिनेटसाठी ४८.८५ टक्के मतदान झाले आहे.

या मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी संस्था प्रतिनिधी म्हणून अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शन संचालक, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, व शिवरत्न शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष सौ.शितलदेवी मोहिते पाटील तसेच शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे,माजी प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

या महाविद्यालयाच्या मतदान केंद्रासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे उत्तम आण्णा राक्षे हे मतदान केंद्राध्यक्ष तर मंगेश नवनाथ गोवर्धन यांनी मतदान अधिकारी म्हणून काम पाहिले.तर मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाचे नाना साठे व सुरेश बनपट्टे यांनी मतदान अधिकारी म्हणून काम पाहिले.या मतदान केंद्रावर मतदान अत्यंत शांततेत पार पडले असून यासाठी शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे मोलाचे सहकार्य लाभले.

सुराज्य सोलापूर

शुक्रवार, दि. ३० सप्टेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# शिकत शिकत कॉलेज लाईफ एन्जॉय करा : मोहिते-पाटील

✔ सुराज्य/अकलूज

युवकांनी कॉलेज शिकत असताना कॉलेजच्या जीवनाचा स्वच्छंदी व मनमुराद आनंद घ्या.या आयुष्यात परत हे आनंदाचे क्षण येणारे नाही आहेत...! असे जयसिंह मोहिते पाटील उर्फ बाळदादा यांनी आज कॉलेजच्या विद्यार्थी यांचे समोर व्यक्त केले.निमीत्त होत विद्यापीठ निवडणुक मतदानासाठी आदरणीय दादासाहेब महाविद्यालयात आलेले होते.



दादा म्हणाले तुम्ही कॉलेजचे विदयार्थी वाटत नाही...सगळे चेहरे याबरल्या सारखे कसे...अरे कॉलेज लाईफ आहे एंजॉय करा पुन्हा कॉलेजच्या जीवनाचा आनंद मिळणार नाही.कॉलेज शिकण्यापेक्षा कॉलेजमध्ये स्वच्छंदी जगा आणि ज्या दिवशी तुम्ही कॉलेज जगायला सुरवात कराल त्यादिवशीपासूनच आयुष्याचा सोहळा सुरू होईल. इथल्या प्रत्येक गोष्टीत सहभाग घ्या.फुलासारखे बागडा, सुंगधीत व्हा...पुन्हा कॉलेजचे हे दिवस येत नाहीत...असे म्हणत असतानाच जे विदयार्थी १४ ऑगष्टच्या कार्यक्रमास चित्ररथाच्या रॅलीमध्ये सहभागी होते त्या सर्वांना सयाजीराजे पार्कची सहल आयोजित करण्याचे निर्देश प्राचार्य बागडे यांना केले. दादा आले,त्यांनी पाहिले,त्यांनी मनं जिंकलं...गाडीत बसून जात असतानाच राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहात रांगोळी स्पर्धा चालू होते त्याठिकाणी जावून रांगोळी पाहिल्या त्यांचे सोबत फोटो काढले...स्मितहास्य करीत गाडी मार्गस्थ झाली.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. १ ऑक्टोबर २०२२ 3

# खुल्या गटातून डॉ.कोळेकर, अनुसूचितमधून डॉ.कडू विजयी

- पदवीधरची मतमोजणी रात्री उशिरापर्यंत सुरू
- विद्यापीठ सिनेट, अभ्यासमंडळ आदींचे निकाल जाहीर
- संस्था प्रतिनिधीमधून अजिंक्यराणा पाटील, वैशाली साठे, रोंगे, गांधी विजयी

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्यापरिषद आणि अभ्यासमंडळाच्या विविध ३८ जागांसाठी ७५ उमेदवार रिंगणात होते. त्यासाठीचे मतदान २९ सप्टेंबर रोजी पार पडल्यानंतर ३० सप्टेंबर रोजी मतमोजणींला सकाळी १० वाजता सुरवात झाली. यामध्ये खुल्य गटातून डॉ. प्रभाकर कोळेकर, अनुसूचीतमधून डॉ. विकास कडू, संस्था प्रतिनिधीमधून अजिंक्यराणा पाटील, वैशाली साठे, सुरज रोंगे, वैभव गांधी विजयी झाले आहेत.**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची निवडणुक प्रक्रीया २९ सप्टेंबर रोजी शहर-जिल्ह्यातील १६ केंद्रावर पार पडली. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या मतमोजणीला शुक्रवारी, ३० सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता सुरुवात झाली. सुरुवातीला सिनेटच्या विद्यापीठ शिक्षकांची मतमोजणी झाली. यामध्ये खुल्या गटातून डॉ. प्रभाकर कोळेकर हे १४ मते घेऊंन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. विकास युटे यांना आठ मते मिळाली.

अनुसूचित जमाती प्रवर्गातून डॉ. विकास कडू हे १६ मते घेऊन विजय झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. श्रीराम राऊत यांना पाच मते मिळाली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संस्था प्रतिनिधी मतदारसंघातून अजिंक्यराणा पाटील, वैशाली साठे, सूरज रोंगे आणि वैभव गांधी विजयी झाले. मिलिंद कुलकर्णी यांचा पराभव झाला. पहिल्या फेरीत पाटील यांना १४, साठे यांना ११, रोंगे यांना १०, गांधी यांना १०, कुलकर्णी यांना ८ मते मिळाली होती. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची मते मोजून झाल्यानंतर विजयी उमेदवारांची नावे निवडणूक निर्णय अधिकारी योगिनी घारे यांनी घोषित केली. अभ्यास मंडळाच्या मतमोजणीमध्ये रसायनशास्त्र अभ्यास मंडळातून डॉ. अब्दुल शेख, डॉ. सतीश देवकर आणि डॉ. विशाल कदम यांनी विजय मिळविला. डॉ. सतीश मित्रगोत्री यांचा पराभव झाला. प्राणीशास्त्र अभ्यासमंडळातून डॉ. राजशेखर हिप्परगी, डॉ. संध्या साळुंखे आणि डॉ. लक्ष्मीकांत दामा यांचा विजय झाला. डॉ. विजयकुमार गाडेकर यांचा पराभव झाला. शैक्षणिक मुल्यमापन अभ्यासमंडळातून डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. विद्युलता पांढरे आणि डॉ. प्रशांत ठाकरे यांचा विजय झाला तर डॉ. अश्विन बोंदार्डे यांचा पराभव झाला. इंग्रजी अभ्यास मंडळातून डॉ. समाधान माने, डॉ. रामराज मोटे आणि डॉ. मनोहर जोशी यांचा विजय झाला तर डॉ. अनुपमा पोळ यांचा पराभव. सिनेटच्या महाविद्यालय शिक्षकांच्या निकालामध्ये खुल्या प्रवर्गासाठी एकूण ९२६ मते होती. त्यातील २२ मध्ये बाद झाली. खुल्या प्रवर्गासाठी मतांचा कोटा १५१ इतका होता. त्यामधून डॉ. वंदना गवळी, डॉ. भगवान आदटराव, डॉ. शिरीष भोसले, डॉ. वीरभद्र दंडे आणि डॉ. समाधान पवार हे निवडून आले. डॉ. गोवर्धन दिकोंडा, डॉ. रमेश मुळीक, डॉ. प्रशांत पवार, डॉ राजकुमार सोनवले आणि डॉ. रवींद्र व्यवहारे यांचा पराभव झाला.

महिला प्रवर्गातून डॉ. एस. ए. गायकवाड यांचा विजय झाला तर विद्याराणी क्षीरसागर यांचा पराभव झाला. गायकवाड यांना ५८८ तर क्षीरसागर यांना २६९ मते मिळाली. डी. टी. एन. टी. प्रवर्गातून डॉ. सुशील शिंदे यांनी डॉ. भूपाल पाटील यांचा पराभव केला. शिंदे हे ४९७ मते घेऊन विजयी झाले. अनुसूचित जाती प्रवर्गातून डॉ. शिरीष शिंदे यांनी डॉ. संजय गायकवाड यांचा पराभव केला. शिंदे यांना ५२३ तर गायकवाड यांना ३३३ मते मिळाली. ओबीसी प्रवर्गातून डॉ जैनुद्दीन मुल्ला हे ५३७ मते घेऊन विजयी झाले. डॉ मल्लिनाथ कलशेट्टी यांचा पराभव झाला. त्यांना ३२९ मते मिळाली.

पुण्य नगरी SMART
शनिवार,१ ऑक्टोबर २०२२

# विद्यापीठ सिनेट निवडणुकीत 'सुटा'ची बाजी

## अजिंक्यराणा पाटील, वैशाली साठे, सुरज रोंगे, डॉ. प्रभाकर कोळेकर विजयी

सोलापूर / प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत विद्यापरिषदेचे पाच, महाविद्यालयीन शिक्षकांमधून दहापैकी आठ आणि सर्वच अभ्यास मंडळावरही (इंग्रजी, प्राणीशास्त्र वगळून) 'सुटा'ने बाजी मारली. विद्यापीठ विकास मंचला अपेक्षित यश मिळविता आले आहे.

विद्यापीठाच्या संस्थाचालक मतदारसंघातून राष्ट्रवादीचे माजी आमदार राजन पाटील यांचे चिरंजीव अजिंक्यराणा पाटील व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्या सून वैशाली साठे या विजयी झाल्या आहेत. त्यांच्यासोबत विद्यापीठ विकास मंचकडून सूरज रोंगे तर वालचंद समुहातर्फे वैभव गांधी हे विजयी झाले. पहिल्या फेरीत पाटील यांना सर्वाधिक १४, वैशाली साठे यांना ११, रोंगे व गांधी यांना प्रत्येकी दहा मते मिळाली. प्रतिस्पर्धी उमेदवार मिलिंद कुलकर्णी यांना आठ मते मिळाली होती. दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची मते मोजून झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव योगिनी घारे यांनी विजयी उमेदवारांची घोषणा केली.



पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सिनेटच्या निवडणुकीत संस्था प्रतिनिधी मतदारसंघातून विजय मिळविल्यानंतर अजिंक्यराणा पाटील यांच्या समर्थकांनी त्यांचे मिरवणूक काढली.

### डॉ. कोळेकर, डॉ. कदू विजयी

सिनेटच्या विद्यापीठ शिक्षकांची मतमोजणी झाली. यामध्ये खुल्या गटातून डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी १४ मते घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. विकास घुटे यांना आठ मते मिळाली. अनुसूचित जमाती प्रवर्गातून डॉ. विकास कदू यांनी १६ मते घेऊन विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. श्रीराम राऊत यांना पाच मते मिळाली.

### अभ्यासमंडळांतून शेख, देवकर, कदम

रसायनशास्त्र अभ्यास मंडळासाठी डॉ. अब्दुल शेख, डॉ. सतीश देवकर आणि डॉ. विशाल कदम यांनी विजय मिळविला आहे. प्राणीशास्त्र अभ्यासमंडळात डॉ. राजशेखर हिप्परगी, डॉ. संध्या साळुंखे आणि डॉ. लक्ष्मीकांत दामा यांचा विजय झालेला आहे. शैक्षणिक मूल्यमापन अभ्यासमंडळाच्या निवडणुकीत डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. विद्युलता पांढरे आणि डॉ. प्रशांत टाकरे यांचा विजय झालेला आहे. इंग्रजी अभ्यास मंडळात डॉ. समाधान माने, डॉ. रामराजा मोटे आणि डॉ. मनोहर जोशी यांचा विजय झाला आहे.

### महाविद्यालय शिक्षकांमधून चुरस

सिनेटच्या महाविद्यालय शिक्षकांचा निकाल जाहीर झाला. खुल्या प्रवर्गासाठी एकूण ९२६ मते होती. त्यातील २२ मध्ये बाद झाली. खुल्या प्रवर्गासाठी मतांचा कोटा १५१ इतका होता. त्यामधून डॉ. वंदना गवळी, डॉ. भगवान आदटराव, डॉ. शिरीष भोसले, डॉ. वीरभद्र दंडे आणि डॉ. समाधान पवार हे निवडून आले आहेत. महिला प्रवर्गातून डॉ. एस ए. गायकवाड यांचा विजय झाला तर डीटीएनटी प्रवर्गातून डॉ. सुशील शिंदे यांनी डॉ. भूपाल पाटील यांचा पराभव केला. अनुसूचित जाती प्रवर्गातून डॉ. शिरीष शिंदे यांनी डॉ. संजय गायकवाड यांचा पराभव केला. ओबीसी प्रवर्गातून डॉ जैनुद्दीन मुल्ला विजयी झाले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

सकाळ | सोलापूर
सोलापूर, शुक्रवार, २ सप्टेंबर २०२२
TODAY

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# महर्षी करंडक ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा

अकलूज, ता. १ : शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या वतीने महर्षी करंडक शालेय व खुल्या राष्ट्रीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा रविवारी (ता. ११) घेण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शंकरराव मोहिते महाविद्यालय घेत असलेल्या या स्पर्धेचे हे ७ वे वर्ष आहे. ही स्पर्धा मराठी भाषेमध्ये असून खुल्या गटासाठी : काय झाडी काय डोंगार काय हाटील...समद ओक्केच, भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष, छत्रपती शिवाजी महाराज दुर्ग व्यवस्थापन, एक तरी ओवी अनुभवावी, वेळीच सावरायला हवं अस्ताव्यस्त पडलेले आवरायला हवं तर शालेय गटासाठी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे चरित्रातून आम्ही काय शिकावे, अकलूजमध्ये संपन्न झालेला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी सोहळा, छत्रपती शिवाजी महाराज, माझा आवडता वैज्ञानीक, मला आवडलेले पुस्तक, असे विषय देण्यात आले आहेत.

स्पर्धेच्या सादरीकरणासाठी ५ मिनिटे व जास्तीत जास्त ५.३० मिनिटांचा कालावधी देण्यात आला आहे. सदर स्पर्धेच्या शालेय गटासाठी ७५ रुपये तर खुल्या गटासाठी १५० रुपये प्रवेश फी ठेवण्यात आली आहे. शालेय गटासाठी प्रथम क्रमांकास २५०० रुपये, द्वितीय क्रमांकास २००० रुपये, तृतीय क्रमांकास १५०० रुपये व प्रमाणपत्र तर खुल्या गटासाठी अनुक्रमे ५०००, ४००० व ३००० रुपये व प्रमाणपत्र अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. तरी स्पर्धेकरीता डॉ. विश्वनाथ आवड ९४२२०२८८३८, डॉ. अपर्णा कुचेकर ९१५६०७०८९४, डॉ. चंकेश्वर लोंढे ९९७०३२८०९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्र.प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी केले आहे.

पुढारी
MY सोलापूर
शनिवार, १ ऑक्टोबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# संस्था प्रतिनिधीमधून पाटील, साठे, रोंगे, गांधी विजयी

## विद्यापीठ सिनेट निवडणूक : अभ्यास मंडळातून डॉ. शेख, डॉ. देवकर, डॉ. कदम यांचे यश

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणुकीत संस्था प्रतिनिधीमूधन अजिक्यराणा पाटील, वैशाली साठे, सूरज रोंगे, वैभव गांधी हे विजय झाले आहेत. तर मिलिंद कुलकर्णी यांचा पराभव झाला. अभ्यासमंडळातून डॉ. अब्दुल शेख, डॉ. सतीश देवकर आणि डॉ. विशाल कदम हे विजयी झाले डॉ. सतीश मित्रगोत्री यांचा पराभव झाला आहे.

सिनेट निवडणुकीची मतमोजणी शुक्रवार पार पडली. मतमोजणीला सकाळी दहा पासून सुरुवात करण्यात आली. रात्री उशीरापर्यंत ही मतमोजणी सुरू होती. सुरुवातीला सिनेटच्या विद्यापीठ शिक्षकांची मतमोजणी झाली.

यामध्ये खुल्या गटातून डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी १४ मते घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. विकास घुटे यांना आठ मते मिळाली. त्यांचा पराभव झाला. अनुसूचित जमाती प्रवर्गातून डॉ. विकास कडू यांनी १६ मते घेऊन विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. श्रीराम राऊत यांना पाच मते मिळाली त्यांचा पराभव झाला. संस्था प्रतिनिधीच्या उमेदवारांना पहिल्या फेरीत पाटील यांना १४, साठे यांना ११, रोंगे यांना १०, गांधी यांना १०, कुलकर्णी यांना ८ मते मिळाली होती. प्राणीशास्त्र अभ्यासमंडळात डॉ. राजशेखर हिप्परगी, डॉ. संध्या साळुंखे आणि डॉ. लक्ष्मीकांत दामा यांचा विजय झालेला आहे. डॉ. विजयकुमार गाडेकर यांचा पराभव झाला. शैक्षणिक मूल्यमापन अभ्यासमंडळाच्या निवडणुकीत डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. विद्युलता पांढरे आणि डॉ. प्रशांत ठाकरे यांचा विजय झालेला आहे. डॉ अश्विन बोंदार्डे यांचा पराभव झाला आहे. इंग्रजी अभ्यास मंडळात डॉ. समाधान माने, डॉ. रामराजा मोटे आणि डॉ. मनोहर जोशी यांचा विजय झाला आहे. डॉ. अनुपमा पोळ यांचा पराभव झाला.दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची मते मोजून झाल्यानंतर विजयी उमेदवारांची नावे निवडणूक निर्णय अधिकारी योगिनी घारे यांनी घोषित केले.

कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी योगिनी घारे यांनी मतमोजणीला सुरुवात केली आहे. मतमोजणीसाठी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी विद्यापीठात उपस्थित होते. विद्यापीठाच्या सर्व अभ्यासमंडळाचे निकाल जाहीर झाले आहेत.

### महाविद्यालय प्रतिनिधीमधून गवळी, आदटराव, भोसले, दंडे विजयी

सिनेटच्या महाविद्यालय प्रतिनिधीमधून डॉ. वंदना गवळी, डॉ. भगवान आदटराव, डॉ. शिरीष भोसले, डॉ. वीरभद्र दंडे आणि डॉ. समाधान पवार, महिला प्रवर्गातून डॉ. एस. ए. गायकवाड, डी टी एन टी प्रवर्गातून डॉ. सुशील शिंदे, अनुसूचित जाती प्रवर्गातून डॉ. शिरीष शिंदे, ओबीसी प्रवर्गातून डॉ. जैनुद्दीन मुल्ला हे निवडून आले.

क्रीडासंचार
सोलापूर, शनिवार, १ ऑक्टोबर २०२२ संचार

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

सिनेट संस्था प्रतिनिधी मतदारसंघ

# साठे, पाटील, रोंगे, गांधी विजयी

## पदवीधर मतदारसंघाचे दोन निकाल घोषित; मोजणी सुरू

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. ३०- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेटच्या संस्था प्रतिनिधी मतदारसंघातून वैशाली जितेंद्र साठे, अजिंक्यराणा पाटील, सूरज रोंगे आणि वैभव गांधी विजयी झाले. मिलिंद कुलकर्णी यांचा पराभव झाला. पहिल्या फेरीत पाटील यांना १४, साठे यांना ११, रोंगे यांना १०, गांधी यांना १०, कुलकर्णी यांना ८ मते मिळाली होती. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची मते मोजून झाल्यानंतर विजयी उमेदवारांची नावे निवडणूक निर्णय अधिकारी योगिनी घारे यांनी घोषित केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणुकीच्या मतमोजणीला शुक्रवारी सकाळी दहा वाजता सुरुवात झाली आहे. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी योगिनी घारे यांनी मतमोजणीला सुरुवात केली. मतमोजणीसाठी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी विद्यापीठात उपस्थित होते.

**विद्यापीठ शिक्षक**

सुरुवातीला सिनेटच्या विद्यापीठ शिक्षकांची मतमोजणी झाली. यामध्ये खुल्या गटातून डॉ. प्रभाकर कोळेकर हे १४ मते



घेऊन विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. विकास घुटे यांना आठ मते मिळाली.

अनुसूचित जमाती प्रवर्गातून डॉ. विकास कडू यांनी १६ मते घेऊन विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. श्रीराम राऊत यांना पाच मते मिळाली.

**महाविद्यालय शिक्षक**

विद्यापीठाच्या सिनेटच्या महाविद्यालय शिक्षकांचा निकाल जाहीर झाला. खुल्या प्रवर्गासाठी एकूण ९२६ मते होती, त्यातील २२ मध्ये बाद झाली. खुल्या प्रवर्गासाठी मतांचा कोटा १५१ इतका होता. त्यामधून डॉ. वंदना गवळी, डॉ. भगवान आदटराव, डॉ. शिरीष भोसले, डॉ. वीरभद्र दंडे आणि डॉ. समाधान पवार हे निवडून आले. डॉ. गोवर्धन दिकोंडा, डॉ. रमेश मुळीक, डॉ. प्रशांत पवार, डॉ. राजकुमार सोनवले आणि डॉ. रवींद्र व्यवहारे यांचा पराभव झाला. महिला प्रवर्गातून डॉ. एस. ए. गायकवाड यांचा विजय झाला तर विद्याराणी क्षीरसागर यांचा पराभव झाला. गायकवाड यांना ५८८ तर क्षीरसागर यांना २६९ मते मिळाली. डीटीएनटी प्रवर्गातून डॉ. सुशील शिंदे यांनी डॉ. भूपाल पाटील यांचा पराभव केला. शिंदे हे ४९७ मते घेऊन विजयी झाले. अनुसूचित जाती प्रवर्गातून डॉ. शिरीष शिंदे यांनी डॉ. संजय गायकवाड यांचा पराभव केला. शिंदे यांना ५२३ तर गायकवाड यांना ३३३ मते मिळाली. ओबीसी प्रवर्गातून डॉ. जैनुद्दीन मुल्ला हे ५३७ मध्ये घेऊन विजयी झाले. डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचा (३२९ मते) यांचा पराभव झाला.

**अभ्यासमंडळ**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सर्व अभ्यासमंडळाचे निकाल जाहीर झाले आहेत. रसायनशास्त्र अभ्यास मंडळासाठी डॉ. अब्दुल शेख, डॉ. सतीश देवकर आणि डॉ. विशाल कदम यांनी विजय मिळविला आहे. डॉ. सतीश मित्रगोत्री यांचा पराभव झाला. प्राणिशास्त्र अभ्यासमंडळात डॉ. राजशेखर हिप्परगी, डॉ. संध्या साळुंखे आणि डॉ. लक्ष्मीकांत दामा यांचा विजय झाला आहे. डॉ. विजयकुमार गाडेकर यांचा पराभव झाला. शैक्षणिक मूल्यमापन अभ्यासमंडळाच्या निवडणुकीत डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. विद्युलता पांढरे आणि डॉ. प्रशांत ठाकरे यांचा विजय झालेला आहे. डॉ. अश्विन बोंदार्डे यांचा पराभव झाला आहे. इंग्रजी अभ्यास मंडळात डॉ. समाधान माने, डॉ. रामराजा मोटे आणि डॉ. मनोहर जोशी यांचा विजय झाला आहे. डॉ. अनुपमा पोळ यांचा पराभव झाला.

**पदवीधर मतदारसंघ**

पदवीधर मतदारसंघातील नऊ जागांपैकी दोन जागांचा निकाल जाहीर करण्यात आला. उर्वरित सात जागांची मतमोजणी रात्री उशीरपर्यंत सुरू होती. ओबीसी प्रवर्गातून नीता सुरेशबाबू मंकणी या १८९१ मते घेऊन विजयी झाल्या. त्यांनी सिराज अहमद चांदसाहब बिजापुरे यांचा पराभव केला. त्यांना १४०६ मते मिळाली. अनुसूचित जमाती मतदारसंघातून उषा नंदकुमार पवार १७३२ मते घेऊन विजयी झाल्या. त्यांनी दिनेश संभाजी भोसले यांचा पराभव केला. भोसले यांना १५९५ मते मिळाली.

जनमत
सर्वसामान्यांचे
संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे
सोमवार १७ ऑक्टोबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन विविध उपक्रमाने साजरा

संग्रामनगर दि.१६ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचाराचे आकलन आत्मसात करून आपला आत्मविश्वास जागृत केला पाहिजे असे मत शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. ते. आणखी पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी देशातील विविध तज्ञांची, मान्यवरांची व विद्वानांची नीतिमूल्य जपली पाहिजे आणि हेच खरे राष्ट्र निर्मितीमध्ये आपले योगदान आहे. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त शंकरराव मोहिते महाविद्यालय ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन विविध क्रमाने साजरा करण्यात आला. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. डी.एस.बागडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पर्यवेक्षक आर.के.इंगोले,सौ.मिले मॅडम,सौ.देशमुख मॅडम,डॉ.नलवडे,प्रा.एन.टी. लोखंडे,प्रा.व्ही.बी.सूर्यवंशी,प्रा. सज्जन पवार,प्रा.दादासाहेब कोकाटे,कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे,ग्रंथपाल प्रा.डी.एस.पाटील आणि विद्यार्थी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल श्री.डी.एस.पाटील यांनी केले त्यांनी यामध्ये वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पाठवून दिले.यावेळी ग्रंथालयाच्या वतीने मराठी कथा कादंबरी, क्रमिक पुस्तके,डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम लिखित पुस्तकांचे प्रदर्शन तसेच त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे भितीपत्रक स्वरूपात प्रदर्शन मांडण्यात आले.या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. जनार्दन परकाळे यांनी मांडले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



सकाळ
सोलापूर, शनिवार, १ ऑक्टोबर २०२२

Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# विद्यापीठाच्या 'सिनेट'वर 'सुटा'चेच वर्चस्व

## पदवीधरची उत्सूकता कायम; अजिंक्यराणा, वैशाली साठेंची बाजी


पद्मजादेवी मोहिते-पाटील


अजिंक्यराणा पाटील


वैशाली साठे


सूरज रोंगे


वैभव गांधी

सोलापूर, ता. ३० : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत सर्वच अधिकार मंडळांवर 'सुटा'ने वर्चस्व कायम राखले. विद्यापरिषदेचे पाच, महाविद्यालयीन शिक्षकांमधून दहापैकी आठ आणि सर्वच अभ्यास मंडळावरही (इंग्रजी, प्राणीशास्त्र वगळून) 'सुटा'नेच (सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघटना) बाजी मारली. पान ७ वर »

### महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये 'सुटा'ला आठ जागा

वालचंद समूह : डॉ. वंदना गवळी
शैक्षणिक महासंघ : डॉ. वीरभद्र दंडे
'सुटा' : डॉ. भगवान आदटराव, डॉ. शिरीष भोसले, डॉ. समाधान पवार, डॉ. सिमा गायकवाड, डॉ. सुशील शिंदे, डॉ. शिरीष शिंदे, डॉ. जैनुद्दीन मुल्ला, डॉ. नितीन तळपाडे.

### अभ्यास मंडळावर 'सुटा'चेच वर्चस्व

वालचंद समूह : डॉ. मनोहर जोशी, डॉ. राजशेखर हिप्परगी
विद्यापीठ विकास मंच : डॉ. लक्ष्मीकांत दामा
'सुटा' : डॉ. अब्दुल शेख, डॉ. सतीश देवकर, डॉ. विशाल कदम, डॉ. संध्या साळुंखे, डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. विद्युलता पांढरे, डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. समाधान माने, डॉ. रामराजा मोटे.

### 'पदवीधर'चा अंतिम निकाल आज

विद्यापीठ विकास मंच : ॲड. निता मंकणी, वर्षाराणी कामुर्ती
सुटा : उषा पवार (युवासेना)

### 'पदवीधर'मध्ये सर्वाधिक मते बाद

पदवीधरसाठी ४८ टक्के मतदान झाले, त्यातही बाद मतांची संख्या नऊशे ते साडेनऊशे राहिली. तीन उमेदवार विजयी झाल्यानंतर पुढील जागांच्या मतमोजणीत पहिल्या फेरीत कोणालाच कोट्याप्रमाणे मते मिळाली नाहीत. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाची मते मोजावी लागली. दरम्यान, बाद मतांमुळे उमेदवारांची धाकधूक वाढली होती. मनोहर सपाटे यांची कन्या मंजुळा सपाटे यांचा ३५ मताने पराभव झाला.

# विद्यापीठाच्या 'सिनेट'वर 'सुटा'चेच वर्चस्व

» पान १ वरून

विद्यापीठ विकास मंचला अपेक्षित यश मिळविता आले आहे.

विद्यापीठाच्या संस्थाचालकांमधून राष्ट्रवादीचे माजी आमदार राजन पाटील यांचे चिरंजीव अजिंक्यराणा पाटील व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्या सून वैशाली साठे विजयी झाल्या. विद्यापीठ विकास मंचकडून सूरज रोंगे तर वालचंद समूहातर्फे वैभव गांधी हे विजयी झाले. पहिल्या फेरीत पाटील यांना सर्वाधिक १४, वैशाली साठे यांना ११, रोंगे व गांधी यांना प्रत्येकी दहा मते मिळाली. प्रतिस्पर्धी उमेदवार मिलिंद कुलकर्णी यांना आठ मते मिळाली होती. दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची मते मोजून झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव योगिनी घारे यांनी विजयी उमेदवारांची घोषणा केली. पद्मजादेवी मोहिते-पाटील यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. विद्यापीठ शिक्षकांमधून डॉ. प्रभाकर कोळेकर व डॉ. विकास कडू यांनी बाजी मारली. पदवीधरमधून रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे हेही बिनविरोध झाले असून मतमोजणीनंतर ॲड. मंकणी व ॲड. उषा पवार हे विजयी ठरले.

पुण्य नगरी
SMAR
शुक्रवार,२ सप्टेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेश मूर्तींचे वाटप

**अकलूज / प्रतिनिधी**

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मितीवर आधारित कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेश मूर्तींचे गरीब व गरजूंना वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाच्या उद्देशाने पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार केल्या. तसेच रंगरंगोटी करून मूर्ती आकर्षक बनवल्या. या उपक्रमामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांचे कौतुक होत आहे. या उपक्रमामध्ये सत्यजित चव्हाण, प्रतीक फुले, समाधान शेंडगे, प्रकाश भोसले, नागनाथ साळवे, अश्विनी वाघमोडे, प्रणाली ननवरे, प्रशांत वाघमारे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. सज्जन पवार, डॉ. सविता सातपुते यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जनमत सर्वसामान्यांचे

शनिवार, ०८ ऑक्टोबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# मूल्य हरवत चाललेल्या समाजात संवादासाठी पारंपरिकता जपण्याची आवश्यकता : प्राचार्या जयश्री धुमाळ

संग्रामनगर दि.७ (प्रतिनिधी)– शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज ज्युनियर विभाग व सिनीयर विभागाच्यावतीने आयोजित केलेल्या भोंडला कार्यक्रमाच्या प्रसंगी महात्मा फुले शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या बोलत होत्या.

त्या पुढे म्हणाल्या की, ग्रामीण संस्कृतीत निर्माण झालेले सण,समारंभ,पारंपरीक खेळ रुढी परंपरा हे समाजाला,कुटुंबाला एकत्र आण्याबरोबरच मनोरंजनाचा महत्वाचा भाग बनलेले होते.पूर्वीच्या काळात संपर्काची साधने कमी होती त्यामुळे माणसां माणसांमध्ये संवाद व्हायचा किंवा उशिरा का होईना पण व्हायचा.आज संपर्काची साधने प्रचंड आली आहेत.आता तर मोबाईलसारख्या साधनाला ख–या जीवनात अत्यंत महत्व आले असून त्यामुळे ख–या जीवनाचे महत्व कमी झालेले आहे.माणसे जगण्याचा सोहळा करण्यापेक्षा मोबाईलवर स्टेटस ठेवण्यासाठी जगायला लागली आहेत कि काय अशी ही भावना त्यांनी व्यक्त केली.

या काळात परतीच्या पावसाला सुरूवात होवून हस्त नक्षत्र निघालेले असते.म्हणूनच समृध्दतेचे प्रतिक असलेल्या हत्तीचे पूजन या खेळात करून खिरापत देवून भोंडला, हादगा....असे पारंपरीक खेळ खेळले जातात.महाराष्ट्राच्या विविध भागात या खेळाला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. जसे भुलाबाई,हदगा होय असे पारंपरिक खेळ किंवा सण समारंभ केवळ महिला मुलींच्यासाठी आवश्यक आहेत असे नाही तर समाज व कुटुंबात एकोपा रहावा यासाठी आवश्यक आहेत असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे होते तर डॉ.विश्वनाथ आवड डॉ.अपर्णा कुचेकर यांचेसह सिनीयर व ज्युनियर विभागातील प्राध्यापिका उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आयोजन प्रा.सुलोचना देशमुख मॅडम केले. यावेळी विविध पारंपरिक गाणी,खिरापत ओळखणे,नृत्य अशा दोन तास चाललेल्या



कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा सुलोचना देशमुख यांनी केले तर प्रास्तविक प्रा.पदमा रहाटे मॅडम यांनी केले. आभार प्रा.घोंगडे मॅडम यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यलयीन अधिक्षक युवराज मालुसरे यांचे सहकार्य लाभले तसेच या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापिका वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या व मिरासदार मॅडम उपस्थित होत्या.

Library Akluj 413101

नवराष्ट्र

# डॉ. कलाम यांचे विचार आत्मसात करा : डॉ. बागडे

अकलुज, विद्यार्थ्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचाराचे आकलन आत्मसात करून आपला आत्मविश्वास जागृत केला पाहिजे, असे मत शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बागडे यांनी व्यक्त केले. शंकरराव मोहिते महाविद्यालय ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक आर. के. इंगोले, प्रा. एन. टी. लोखंडे, प्रा. व्ही. बी. सूर्यवंशी, प्रा. सज्जन पवार, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे, ग्रंथपाल प्रा. डी. एस. पाटील आणि विद्यार्थी आदी उपस्थित होते. प्रा. रामलिंग सावळजकर यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जीवन प्रेरणादायी असल्याची सांगितले. प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल डी. एस. पाटील यांनी केले. आभार प्रा. डॉ. जनार्दन परकाळे यांनी मांडले.

Paschim Maharashtra Plus Edition
21 October 2022 Page No. 1
epaper.navarashtra.com

ShareChat
@Rolex

# सत्यवचन

जीवन त्यांचेच मस्त आहे, जो स्वतःच्या कामात व्यस्त आहे. परेशान तेच आहेत, जे दुसऱ्यांच्या आनंदाने त्रस्त आहेत.

संतसूर्य दि.१७/१०/२०२२

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन विविध उपक्रमाने साजरा

**अकलूज**

विद्यार्थ्यांनी डॉ.ए..पी..जे.अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचाराचे आकलन आत्मसात करून आपला आत्मविश्वास जागृत केला पाहिजे असे मत शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. ते आणखी पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी देशातील विविध तज्ञांची, मान्यवरांची व विद्वानांची नीतिमूल्य जपली पाहिजे आणि हेच खरे राष्ट्र निर्मितीमध्ये आपले योगदान आहे. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त शंकरराव मोहिते महाविद्यालय ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन विविध क्रमाने साजरा करण्यात आला.डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या




प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पर्यवेक्षक आर. के.इंगोले ,सौ.मिले मॅडम,सौ.देशमुख मॅडम,डॉ.नलवडे,प्रा.एन.टी. लोखंडे,प्रा.व्ही.बी.सूर्यवंशी,प्रा. सज्जन पवार,प्रा.दादासाहेब कोकाटे,कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे,ग्रंथपाल प्रा.डी.एस.पाटील आणि विद्यार्थी आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल श्री.डी.एस.पाटील यांनी केले त्यांनी यामध्ये वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पाठवून दिले.यावेळी ग्रंथालयाच्या वतीने मराठी कथा कादंबरी, क्रमिक पुस्तके,डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम लिखित पुस्तकांचे प्रदर्शन तसेच त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे भितीपत्रक स्वरूपात प्रदर्शन मानण्यात आले.या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. जनार्दन परकाळे यांनी मांडले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन विविध उपक्रमाने साजरा



अकलूज (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचाराचे आकलन आत्मसात करून आपला आत्मविश्वास जागृत केला पाहिजे असे मत शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. ते आणखी पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी देशातील विविध तज्ञांची, मान्यवरांची व विद्वानांची नीतिमूल्य जपली पाहिजे आणि हेच खरे राष्ट्र निर्मितीमध्ये आपले योगदान आहे. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त शंकरराव मोहिते महाविद्यालय ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन विविध क्रमाने साजरा करण्यात आला.डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ.डी.एस.बागडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पर्यवेक्षक आर.के.इंगोले,मिले,देशमुख ,डॉ.नलवडे,प्रा.एन.टी.लोखंडे,प्रा.व्ही.बी .सूर्यवंशी,प्रा.सज्जन पवार,प्रा.दादासाहेब कोकाटे,कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे,ग्रंथपाल प्रा.डी.एस.पाटील आणि विद्यार्थी आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ग्रंथपाल डी.एस.पाटील यांनी केले त्यांनी यामध्ये वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पाठवून दिले.यावेळी ग्रंथालयाच्या वतीने मराठी कथा कादंबरी, क्रमिक पुस्तके,डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम लिखित पुस्तकांचे प्रदर्शन तसेच त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे भितीपत्रक स्वरूपात प्रदर्शन मानण्यात आले.या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. जनार्दन परकाळे यांनी मांडले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## घुसखोरी

बघेल तिथं ज्याची त्याची
एकमेकांना हमरीतुमरी...
नको तिथं ज्याची त्याची
दिसते आहे घुसखोरी...||
हिवाळा ऋतूत आता
पावळाही घुसला...
माणसाप्रमाणे ऋतू
पावसाळा बदलला...||

**हणमंत पडवळ,**
उस्मानाबाद,
8698067566

सुराज्य
सोलापूर

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची अकलूज घोडेबाजाराला अभ्यास भेट

अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनची अभ्यासक्रमांतर्गत अकलूजच्या शंकरराव मोहिते-पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीने आयोजित केलेल्या घोडेबाजारास भेट देण्यात आली.या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण १४३ विद्यार्थी व विद्यार्थींनी सहभाग नोंदविला होता. त्यांना घोड्यांच्या विविध प्रकारच्या प्रजाती, खरेदी-विक्री व किंमती संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. यावर्षी घोडेबाजारचे लक्ष वेधून घेतले ते ५१ लाख रुपयाच्या किंमतीच्या सलमान नावाच्या पंजाबी घोड्याने.

हिंदुस्थान चॅम्पियन असलेल्या हत्ती घोड्याचे पिल्लू, ७० इंच उंचीचा, देखणा, पांढरा शुभ्र, जन्मतः डोळ्यांना काजळ, तोंडाला तीळ,गळ्याला देवमन (बोहरा) वयाने २ वर्षाचा हा घोडा लोकांना भुरळ घालत आहे. दरवर्षी दीपावली पाडव्याला शुभारंभ होऊन साधारणपणे एक ते दीड महिन्यापर्यंत घोडेबाजार चालतो. कृषी उत्पन्न बाजार,समितीमार्फत या कालावधीमध्ये औषध सुविधा, वीजपुरवठा, पाणी, नैसर्गिक वातावरणातील जागा, सुरक्षा सर्व मोफत दिल्या जातात. या उपक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजेंद्र काकडे, शिवराज माने-पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालसरे यांचे मार्गदर्शन लाभले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रत्नदीप गायकवाड, डॉ. भगवानराव साळुंखे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. अण्णासाहेब नलवडे यांचेही मार्गदर्शन मिळाले. या घोडेबाजार भेटीस अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. पल्लवी मिसाळ, प्रा. शिवाजी राजगुरू, प्रा. नितीन साळुंखे, वाणिज्य विभागाचे प्रा. धीरज गुरव, प्रा. गणेश धायगुडे, प्रा. विनायक माने उपस्थित होते.

# जनमत

## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे - मो.९४२३३४२९७०

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

शुक्रवार ११ नोव्हेंबर २०२२


Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101



## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची अकलूज घोडेबाजाराला अभ्यास भेट

संग्रामनगर दि.१० (प्रतिनिधी)- शंकरराव मोहिते महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनची अभ्यासक्रमांतर्गत अकलूजच्या शंकरराव मोहिते-पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीने आयोजित केलेल्या घोडेबाजारास भेट देण्यात आली.या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण १४३ विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभाग नोंदविला होता. त्यांना घोड्यांच्या विविध प्रकारच्या प्रजाती,खरेदी-विक्री व किंमती संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. सन २००९ साली सुरू झालेल्या अकलूजच्या घोडेबाजारामध्ये दरवर्षी भारतातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशामधून घोड्यांचा सहभाग असतो.या वर्षीही महाराष्ट्राबरोबर दिव-दमण,पंजाब ,हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली, राजस्थान, बिहार, गुजरात या व इतर अनेक राज्यांतून विविध जातींचे २० हजारांपासून ते १ कोटी रुपयेपर्यंत किंमतीचे घोडे या बाजारात दाखल झाले आहेत.त्यामध्ये मारवाड,सिंधी,राजस्थानी ,पंजाब,काटेवाडी अशा जातींच्या एकूण १५६० घोड्यांचा सहभागी झाले आहेत. आतापर्यंत ४१५ घोड्यांची विक्री होऊन अंदाजित ४ कोटी रुपयेपर्यंत उलाढाल झाली आहे. या वर्षी घोडेबाजारचे लक्ष वेधुन घेतले ते ५१ लाख रुपयाच्या किंमतीच्या सलमान नावाच्या पंजाबी घोड्याने. हिंदुस्थान चॅम्पियन असलेल्या हत्ती घोड्याचे पिल्लू, ७० इंच उंचीचा,देखणा,पांढरा शुभ्र, जन्मतःडोळ्यांना काजळ, तोंडाला तीळ,गळ्याला देवमन (बोहरा),वयाने २ वर्षाचा हा घोडा लोकांना भुरळ घालत आहे. दरवर्षी दीपावली पाडव्याला शुभारंभ होऊन साधारणपणे एक ते दीड महिन्यापर्यंत घोडेबाजार चालतो. कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत या कालावधीमध्ये औषध सुविधा,वीजपुरवठा,पाणी, नैसर्गिक वातावरणातील जागा, सुरक्षा सर्व मोफत दिल्या जातात. या उपक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळांचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजेंद्र काकडे,शिवराज माने-पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. हा उपक्रम पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे तसेच कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.रत्नदीप गायकवाड,डॉ. भगवानराव साळुंखे,अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.अण्णासाहेब नलवडे यांचेही मार्गदर्शन मिळाले.या घोडेबाजार भेटीस अर्थशास्त्र विभागाच्या डॉ.पल्लवी मिसाळ,प्रा.शिवाजी राजगुरू,प्रा.नितीन साळुंखे,वाणिज्य विभागाचे प्रा.धीरज गुरव,प्रा.गणेश धायगुडे,प्रा.विनायक माने उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

रविवार, दि. १३ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# सल्लागार समितीवर डॉ. देशमुख यांची निवड



✔ सुराज्य/अकलूज : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू यांचे आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्र पुणे अंतर्गत पुणे, सोलापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यातील अभ्यास केंद्राचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्राचे काम अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण व सक्षम होण्यासाठी जिल्हा निहाय एका तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. यामध्ये डॉ. आबासाहेब देशमुख यांची सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ते सोलापूरविद्यापीठ प्राचार्य फोरमचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएचडी संपादन केलेली असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

पुण्य नगरी
SMART
रविवार,१३ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

Shikshan Prasarak Mandal's

# Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj,

Tal : Malshiras, Dist : Solapur.

॥ तेवो सदा ज्ञानमय प्रदीप ॥

(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)

## WALK - IN - INTERVIEW

Eligible Candidates are invited for the following purely temporary posts on Clock Hour Basis (CHB) Two CHB candidates will be appointed against each full time post. (Grant, Non Grant & Post Graduate Non-Grant Seciton)

| Sr. No. | Designation | | Grant Posts C.H.B. | Non Grant Post C.H.B. | Reservation |
|---|---|---|---|---|---|
| | **Assistant Professor in** | **Total Post CHB** | | | **Under Graduate Grantable Posts** |
| 1. | Physics | 06 | 06 | 00 | Open TO All |
| 2. | Chemistry | 08 | 08 | 03 | Open TO All |
| 3. | Botany | 06 | 06 | 01 | Open TO All |
| 4. | Zoology | 08 | 08 | 00 | Open TO All |
| 5. | Mathematics | 02 | 02 | 01 | Open TO All |
| 6. | English | 02 | 02 | 01 | Open TO All |
| 7. | Economics | 02 | 02 | 02 | Open TO All |
| 8. | Commerce | - | - | 05 | Open TO All |
| 9. | Statistics | 02 | 01 | - | Open TO All |
| 10. | Psychology | 02 | 01 | - | Open TO All |
| 11. | Electronics | 02 | 02 | - | Open TO All |
| | **Post Graduate Non - Grant Posts** | | | | |
| 1. | Electronics | 10 | - | 10 | Open TO All |
| 2. | Agro Chemicals & Pest Management | 08 | - | 08 | Open TO All |

**N.B. :** 1) The appointments will be made as per the terms & conditions mentioned in the Government of Maharashtra G.R. dated 14.11.2018

2) No. of posts will depend up on the actual workload.

**Interested candidates may attend the interview along with the original documents & Bio data on 19/11/2022 at 9.30 a.m. at Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj, Dist. - Solapur.**

**Dr. Dattatraya Bagade**
I/C Principal
Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj

**Sangramsinh Mohite-Patil**
President
Shikshan Prasarak Mandal, Akluj

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. १५ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात पक्षी सप्ताह साजरा

**सुराज्य/अकलूज** : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर वनीकनरण विभागाचे अधिकारी संजय भोईटे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. याप्रसंगी भोईटे यांनी आपल्या भाषणातून व पक्षांच्या पंखाच्या प्रदर्शनातून पक्षांवरील प्रेम व आपुलकी विद्यार्थ्यांना निर्माण करून दिली. पक्षांपासून मानवी जीवनाला व निसर्गाला होणारे फायदे कसे होतात व पक्षांचे संवर्धन हेच मानवाचे रक्षण तसेच निसर्ग समतोल राखण्याचे काम पक्षी करतात ते पटवून दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राणी शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुधा बनसोडे (गायकवाड) यांनी निसर्गाचे संतुलन कसे राखतात याचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बागडे यांनी निसर्ग आणी मानवी जीवन यावर प्रकाश टाकला. यावेळी संजय भोईटे यांनी विविध पक्षांच्या पंखाचे संग्रहाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्याचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. पद्मावती रहाटे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. श्रुती चव्हाण हिने मानले. हा कार्यक्रम यशस्वी व बहारदार करण्यासाठी प्रा. अप्पासाहेब व्यवहारे, प्रा. पुजा सावंत, गणपतराव लोंढे व प्राणी शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

क्रीडासंचार

सोलापूर, बुधवार, १६ नोव्हेंबर २०२२ संचार

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# डॉ. देशमुख यांची सल्लागारपदी नियुक्ती

संचार वृत्तसेवा



अकलूज, दि. १५- येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर कुलगुरू यांच्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्र पुणे अंतर्गत पुणे, सोलापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यातील अभ्यास केंद्राचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्राचे काम अधिकाधिक गुणवत्तापूर्ण व सक्षम होण्यासाठी जिल्हा निहाय एका तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. यामध्ये डॉ.आबासाहेब देशमुख यांची सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. आबासाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील ४० वर्षाच्या अनुभवामध्ये प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथे १९८० ते १९९५ या कालावधीत प्राध्यापक म्हणून तर शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज येथे १९९५ ते २०२१ या कालावधीत प्राचार्य म्हणून काम करताना अनेक नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविले. त्यांनी २००४ मध्ये ७८ विद्यार्थी घेऊन शंकरराव मोहिते महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यास केंद्र सुरू केले. आज या केंद्रात दरवर्षी दीड हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या केंद्रात शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी पी.एस.आय., नायब तहसीलदार, पोलीस, प्राध्यापक, शिक्षक म्हणून विविध ठिकाणी काम करत आहेत. डॉ. आबासाहेब देशमुख यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

जनसत्य बुधवार, दि. १६ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# डॉ. देशमुख यांची चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या सल्लागार समितीवर नियुक्ती

जनसत्य, प्रतिनिधी

**अकलूज :** अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू यांचे आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्र पुणे अंतर्गत पुणे, सोलापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यातील अभ्यास केंद्राचा समावेश होतो.. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्राचे काम अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण व सक्षम होण्यासाठी जिल्हा निहाय एका तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते.यामध्ये डॉ. आबासाहेब देशमुख यांची सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.आबासाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील ४० वर्षांच्या अनुभवामध्ये प्रतिष्ठान महाविद्यालय ,पैठण येथे १९८० ते १९९५ या कालावधीत प्राध्यापक म्हणून तर शंकरराव मोहिते महाविद्यालय,अकलूज येथे १९९५ ते २०२१ या कालावधीत प्राचार्य म्हणून काम करताना अनेक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविले. त्यांनी १९९८ मध्ये १६५ विद्यार्थी घेऊन शंकरराव मोहिते महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण विद्यापीठ ,नाशिक चे अभ्यास केंद्र सुरू केले. आज या केंद्रात दरवर्षी दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या केंद्रात शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी पी.एस. आय.,नायब तहसीलदार ,पोलीस ,प्राध्यापक ,शिक्षक म्हणून विविध ठिकाणी काम करत आहेत. डॉ. आबासाहेब देशमुख यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य शिक्षक पुरस्कार, सोलापूर विद्यापीठाचा उत्कृष्ट पुरस्कार,आदर्श प्राचार्य पुरस्कार तसेच सायन्स ओलंपियाड फाउंडेशन, दिल्लीचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार ही त्यांना मिळालेला आहे.

दैनिक दिव्य मराठी

सोलापूर जिल्हा

सोलापूर, गुरुवार, १७ नोव्हेंबर २०२२ | कार्तिक कृ. ८, शके १९४४

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# मुक्त विद्यापीठ सल्लागार समितीवर देशमुखांची निवड

प्रतिनिधी । अकलूज, निमगाव



अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रांतर्गत पुणे, सोलापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यांतील अभ्यास केंद्राचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्राचे काम अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण व सक्षम होण्यासाठी जिल्हानिहाय एका तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. यामध्ये डॉ. आबासाहेब देशमुख यांची जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.


डॉ. देशमुख यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील ४० वर्षाच्या अनुभवामध्ये प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथे १९८० ते १९९५ या कालावधीत प्राध्यापक, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज येथे १९९५ ते २०२१ या कालावधीत प्राचार्य असताना नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविले. १९९८ मध्ये १६५ विद्यार्थी घेऊन शंकरराव मोहिते महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सुरू केले. त्यामध्ये दरवर्षी दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांना विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार, ०८ नोव्हेंबर २०२२

Mohite Mahavidyalaya Library - 413101

# एखाद्या कलेचा दर्दी..प्रोत्साहनाची गर्दी करून जातो : सिनेअभिनेते अजय तपकिरे



संग्रामनगर दि.०७ (प्रतिनिधी)- अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज व अखिल भारतीय नाटय परीषद शाखा अकलूज यांचे संयुक्त विद्यमाने मराठी रंगभुमी दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम नाटयावलोकन,नाटयछटा ते अभिनयाचा प्रवास या कार्यक्रमा प्रसंगी त्यांनी व्यक्त विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी [illegible] डे या एकाकाकतील एक प्रवेश प्रचंड उर्जा व ताकदीने सादर केला. वाक्यफेक,चेहऱ्यावरील हावभाव,आवाजातील चढउतार,स्टेजवरील वावर व जागेचा वापर,प्रॉपर्टी नसताना त्याबाबतचे मायमिंग अशा अनेक बारीक सारीक जागा त्यांनी १५ मिनीटाच्या प्रवेशातून प्रत्यक्ष दाखवून दिल्या.

हा रंगभुमीवरचा प्रवास सिनेसृष्टीतल्या व विविध मालीकामधील अभिनयासाठी उपयुक्त ठरला त्यामुळे एखाद्या कार्यक्रमासाठी गर्दी नसली तरी रंगदेवतेची सेवा करताना एक जरी प्रेक्षक समोर असेल तर त्याच्या साठीही आपण अभिनय करायलाच पाहिजे अशी रंगभुमीबद्दल असणारी भावना त्यांनी व्यक्त केली. ड्रॉय डे,पिंडग्रान,त्याच्या भल्लरीची भैरवी,एका स्वप्न , गर्भाचा मृत्यू,गांधी ते गोध्रा,फितुर ते चंद्र अशा अनेक एकांकिका व सादरीकरणाचे तपशिल त्यांनी सअभिनय उलगडून दाखविले. माळशिरस तालुक्यात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, शिवामृत दुध संघाचे चेअरमन व अखिल भारतीय नाटय परीषद अकलूज शाखेचे अध्यक्ष धैर्यशिल मोहिते पाटील,शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील कलेले दिलेले प्रोत्साहन यामुळे विविध कलावंत तयार झालेले आहेत. त्यामाध्यातूनच कथाकथन या साहित्य प्रकारात हळूहळू आपली पकड निर्माण करण्यासाठी नागनाथ साळवे हा तरंगफळ या गावचा उमदा कलाकार तयार झालेला आहे, त्यानेही मराठी रंगभुमी दिनाच्या निमीत्ताने ग्रामीण जीवन शैलीवर अधारीत एक कथा कथन केली...मांडणीचा बाज,ग्रामीण बोलीभाषा,त्यातुन निर्माण होणार नर्म विनोद असे उत्कृष्ट सादरीकरण त्याने केली.

या कार्यक्रमाची सुरवात नटराजाच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली.यावेळी डॉ.सविता सातपुते,लाला मुजावर हे उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागातील व नाटय परिषदेच्या सदस्यांना परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन, निर्देशन डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले.

पुण्य नगरी SMART
मंगळवार,८ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101


# वेळापूरचा ऐतिहासिक वारसा पर्यटनदृष्ट्या प्रेरणादायी : प्रा.देवकर

## एक दिवसीय वारसा वेळापूरचा इतिहास व मंदिर स्थापत्य अभ्यास दौरा

अकलूज / प्रतिनिधी

वेळापुरचा ऐतिहासीक वारसा पर्यटनदृट्या प्रेरणादायी असल्याचे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ पुरातत्व शास्त्र विभागाचे सहाय्यक प्रा.सदाशिव देवकर यांनी व्यक्त केले.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठ सोलापूर संलग्नित, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज इतिहास विभाग व राज्यशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय वारसा वेळापुरचा इतिहास व मंदिर स्थापत्य अभ्यास दौऱ्यामध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे प्रेरणेतुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांचे नेतृत्वाखाली महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याच अनुषंगाने इतिहास व राज्यशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वेळापुरचा अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आलेले होते.



या अभ्यास दौऱ्यामध्ये इतिहास परीषदेचे दिग्विजय जाधव, रविराज लव्हाळे, पत्रकार अशोक पवार, गुरुव गुरुजी, डॉ.चंकेश्वर लोंढे, प्रा. हणमंत तेलसंग, प्रा.समाधान माने, प्रा.बावळे, प्रा.रवि नागटिळक, प्रा.अमोल खरात, पर्यटन व्यवयायीक वैभव आंबेकर यांचेसह महाविद्यालयातील ८६ विद्यार्थी सहभागी झालेले होते. एकदिवसीय अभ्यास दौरा

सुराज्य सोलापूर
गुरूवार, दि. १७ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

✓ सुराज्य/अकलूज

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित व्यक्तीमत्व विकास व संधी याविषयीची कार्यशाळा पार पडली. यावेळी स्टार्टअप ग्लोबल ई ट्रेडच्या संचालिका सलमा मुल्ला यांनी मार्गदर्शन केले.

शंकरराव मोहिते महाविद्यालयात शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील आणि विदयमान अध्यक्ष व महाविदयालय विकास समितीचे चेअरमन संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी अनेक उपक्रम आयोजित केले जातात त्याहेतुजेच व्यक्तीमत्व विकास संधी व विकास याविषयीची कार्यशाळा महाविदयालयाचे प्र प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे यांचे सहकार्याने राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेली होती. या कार्यशाळमध्ये राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे सुत्रसंचलन भावना यींगाणे हिने केले तर आभार सायली मुंढफणे हिने मानले. प्रस्ताविक रुतुजा देशमुखने केले व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रकाश भोसले, समाधान डूगळे, प्रज्वल खंडागळे, शुभम मस्तुद, हितेष पुंज विदयार्थिनी यांनी सहकार्य केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

सकाळ
सोलापूर, गुरुवार, ३ नोव्हेंबर २०२२ ६

# विद्यापीठाची १४ डिसेंबरपासून सत्र परीक्षा

## ऑफलाइन परीक्षेसाठी असतील वर्णनात्मक प्रश्न

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची आगामी सत्र परीक्षा १४ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. ही परीक्षा ऑफलाइन होणार असून त्यावेळी वर्णनात्मक प्रश्नांची प्रश्नपत्रिका असेल, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

कोरोनामुळे २०२० व २०२१ या दोन वर्षांत विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच पार पडल्या. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यावर मागील परीक्षा ऑफलाइन पार पडली. पण, लिखाणाचा सराव नसल्याने विद्यार्थ्यांनी वर्णनात्मक प्रश्नपत्रिकेला विरोध केला. तो विषय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहचला आणि ऐनवेळी विद्यापीठाला परीक्षेचे स्वरुप बदलावे लागले होते. पण, स्पर्धेच्या काळात आपल्या विद्यापीठाची मुले दर्जेदार व गुणवत्तापूर्ण असावीत यादृष्टीने विद्यापीठाने आता आगामी सत्र परीक्षा पूर्वीप्रमाणेच घेण्याचे ठरवले आहे. १४ नोव्हेंबरपासून सुरू झालेली सत्र परीक्षा ३० जानेवारी २०२३ पर्यंत चालणार आहे. त्यात अभियांत्रिकीचे प्रथम व द्वितीय वर्ष सोडून तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा होईल. उर्वरित विद्यार्थ्यांची द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षाची सत्र परीक्षा होणार असल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास करून परीक्षा द्यावी, असे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

### १३ डिसेंबरला राज्यपाल सोलापूर दौऱ्यावर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा पदवीदान समारंभ पुढील महिन्यात होणार आहे. विद्यापीठाने त्यादृष्टीने तयारी केली असून राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांना कार्यक्रमाचे निमंत्रण पाठविले आहे. १२ किंवा १३ डिसेंबर रोजी तो समारंभ विद्यापीठात पार पडणार आहे. राज्यपालांची वेळ मिळाल्यानंतर त्यांच्याच प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

### दोन सत्रात ९० दिवसांचे बंधन

पहिल्या सत्राची परीक्षा झाल्यानंतर पुढील सत्र परीक्षा होण्यापूर्वी ९० दिवसांचे अध्यापन व्हायला हवे, असा नियम आहे. तेवढा कालावधी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची (अभ्यासक्रम) सर्वप्रथम परीक्षा होईल. त्यानंतर जानेवारीत उर्वरित विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. १४ डिसेंबर ते जानेवारी २०२३ अखेर सत्र परीक्षा उरकली जाणार आहे. 'बोर्ड ऑफ स्टडी'च्या मान्यतेनुसार प्रश्नपत्रिकांचे कामकाज युद्धपातळीवर सुरु झाला आहे. दररोज तीन सत्रात (दररोज तीन पेपर) परीक्षा होईल, असे नियोजन करण्यात आले आहे.

# जनमत

## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे

सोमवार १४ नोव्हेंबर २०२२ वर्ष १३ अंक १२३ पृष्ठे ८



Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर डॉ.आबासाहेब देशमुख यांची निवड

संग्रामनगर दि.१२ (प्रतिनिधी) – अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील विभागीय केंद्राच्या सल्लागार समितीवर मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू यांचे आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्र पुणे अंतर्गत पुणे, सोलापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यातील अभ्यास केंद्राचा समावेश होतो.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्राचे काम अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण व सक्षम होण्यासाठी जिल्हा निहाय एका तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते.यामध्ये डॉ.आबासाहेब देशमुख यांची सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ.आबासाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील ४० वर्षाच्या अनुभवामध्ये प्रतिष्ठान महाविद्यालय,पैठण येथे १९८० ते १९९५ या कालावधीत प्राध्यापक म्हणून कार्यरत होते तर शंकरराव मोहिते महाविद्यालय,अकलूज येथे १९९५ ते २०२१ या कालावधीत प्राचार्य म्हणून काम करताना अनेक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविले होते. त्यांनी २००४ मध्ये ७८ विद्यार्थी घेऊन शंकरराव मोहिते महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिकचे अभ्यास केंद्र सुरू केले.आज या केंद्रात दरवर्षी दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.या केंद्रात शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी पी.एस.आय.,नायब तहसीलदार,पोलीस,प्राध्यापक ,शिक्षक म्हणून विविध ठिकाणी काम करत आहेत.डॉ.आबासाहेब देशमुख यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य शिक्षक पुरस्कार,सोलापूर विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार,दैनिक लोकमत आदर्श प्राचार्य पुरस्कार तसेच सायन्स ओलिंपियाड फाउंडेशन,दिल्लीचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार ही त्यांना मिळालेला आहे. डॉ. देशमुख यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सिनेट,अकॅडमी कौन्सिल,बोर्ड ऑफ स्टडीज,राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती,परीक्षा मंडळ, स्थायी समिती अशा विविध प्राधिकरणावर सदस्य म्हणून काम पाहिलेले आहे.तसेच दोन वेळा सायन्स विभागाचे अधिष्ठाता व ॲग्रो केमिकल व पेस्ट मॅनेजमेंट विषयाचे अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.त्यांच्या सेवा कालावधीत शंकरराव मोहिते महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार दोन वेळा तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारही मिळाला आहे.

सध्या ते सोलापूरविद्यापीठ प्राचार्य फोरमचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएचडी संपादन केलेली असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

शैक्षणिक, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याच्या



अनुभवाचा फायदा मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांस व्हावा या हेतूने डॉ. देशमुख यांची सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून विभागीय केंद्र, पुणे सल्लागार समितीवर तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. २२ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# नवउद्योजक निर्माण करण्यासाठी विद्यापीठाची सहकार्याची भूमिका : डॉ.लड्ढा

अकलूज : तालुक्यातील आणि ग्रामीण भागातील नव युवकांना आणि युवतींना व्यवसायासाठी आणि नवउद्योगासाठी लागणारे प्रशिक्षण आणि भांडवल विद्यापीठातर्फे पुरवण्यात येईल. शंकरराव मोहिते महाविद्यालयाने नेहमीच नवयुकांना प्रोत्साहन देऊन नवउद्योजक बनवण्याचे कार्यक्रम राबविले आहेत उद्योजक निर्माण करण्यासाठी विद्यापीठ नेहमीच सहकार्याच्या भूमिकेत असेल असे मत सोलापूर विद्यापीठाचे इनोवेशन, इंक्युबेशन अँड लिंकेजेसचे डायरेक्टर डॉ. सचीन लड्ढा यांनी व्यक्त केले.



शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज व इंक्युबेशन संटर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने सोलापूर स्टार्टअप यात्रा: व्यास नाविन्याचा शोध नव उद्योजकांचा या अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रेरणेने निमंत्रक संस्थेमार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी उद्योजक जितेंद्र बाजारे यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम समन्वयक डॉ विश्वनाथ आवड, डॉ आण्णासाहेब नलावडे, डॉ चंद्रशेखर ताटे देशमुख, प्रा विनायक माने, प्रा शिवाजी राजगुरु, प्रा नितीन साळुंखे, डॉ विशाल सांळुंखे, प्रा जयंत माने, युवराज मालुसरे, नेहा माने, प्रकाश सुरवसे, भावना यॉगाणे, सायली मुंढफणे, वैष्णवी खिलारे, रुतुजा पवार, भाग्यश्री सातपुते, स्वप्नील खंडागळे, समाधान इंगळे, कृष्णा जगताप, सुरज नलवरे, मारुती सुर्वे, समाधान वायमोडे यांनी प्रयत्न केले. या कार्यशाळेत प्रा.विष्णु सुर्वे, डॉ.सज्जन पवार, डॉ आप्पासाहेब बाबर, प्रा.बाबूराव पाटील, प्रसाद लोहार, डॉ रामभाऊ सावळजकर, डॉ सविता सातपुते, डॉ सुधा बनसोडे यांच्यासह माळशिरस तालुका परीसरातील विविध कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील १७५ पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु भावना यॉगाणे व नेहा माने यांनी केले.

जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार, २२ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालय नव उद्योजक निर्मितीचे केंद्र बनेल: डॉ. सचीन लड्ढा





अकलूज,दि. २१ (प्रतिनिधी) दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज व इंक्युबेशन सेंटर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने सोलापूर स्टार्टअप यात्रा: ध्यास नाविन्याचा शोध नव उद्योजकांचा या अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रेरणेने निमंत्रक संस्थेमार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना डॉ लड्ढा म्हणाले की महाविद्यालय आणि संस्था नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक प्रयत्न करत आहे या अनुषंगाने तालुक्यातील विद्यार्थी विद्यार्थिनी आणि नवउद्योजक यांना सामावून घेऊन उद्योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी संस्था तत्पर राहील. यावेळी बोलताना तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक श्री जितेंद्र बाजारे यांनी विद्यार्थी आणि नवउद्योजकांना त्यांना आलेल्या अनुभवांची गाथा कथन केली तसेच उद्योजकांच्या माहितीसाठी त्यांनी आपला जीवन प्रवास सांगितला आणि यामध्ये व्यवसाय कौशल्याचा कस उद्योगांमध्ये कसा लागतो याची देखील माहिती दिली. यावेळी अध्यक्षस्थानी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे होते. सोलापूर विद्यापीठाचे इनोवेशन, इंक्युबेशन अँड लिंकेजेसचे डायरेक्टर डॉ.सचिन लड्ढा पुढे बोलताना म्हणाले की तालुक्यातील आणि ग्रामीण भागातील नव युवकांना आणि युवतींना व्यवसायासाठी आणि नवउद्योगासाठी लागणारे प्रशिक्षण आणि भांडवल विद्यापीठातर्फे पुरवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी विद्यापीठाच्या उद्यम इंक्युबेशन सेंटरचे मॅनेजर श्री. श्रीनिवास पाटील आणि श्री. श्रीनिवास नलगेशी तसेच बसवराज सुतार उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम समन्वयक डॉ विश्वनाथ आवड, डॉ आण्णासाहेब नलवडे, डॉ चंद्रशेखर ताटे देशमुख, प्रा विनायक माने, प्रा शिवाजी राजगुरु, प्रा नितीन साळुंखे, डॉ विशाल सांळुंखे, प्रा जयंत माने, श्री युवराज मालुसरे, नेहा माने, प्रकाश सुरवसे, भावना घोंगाणे, सायली मुंडफणे, वैष्णवी खिलारे, रुतुजा पवार, भाग्यश्री सातपुते, स्वप्नील खंडागळे, समाधान इंगळे, कृष्णा जगताप, सुरज ननवरे, मारूती सुर्वे, समाधान वाघमोडे यांनी प्रयत्न केले. या कार्यशाळेत प्रा विष्णु सुर्वे, डॉ सज्जन पवार, डॉ आप्पासाहेब बाबर, प्रा बाबूराव पाटील, प्रा प्रसाद लोहार, डॉ रामभाऊ सावळजकर, डॉ सविता सातपुते, डॉ सुधा बनसोडे यांचेसह माळशिरस तालुका परीसरातील विविध कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील १७५ पेक्षा जास्त विदयार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु भावना घोंगाणे व कु नेहा माने यांनी केले.

सर्वसामान्यांचे

शुक्रवार, १८ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# जागतिक तत्त्वज्ञान दिन



प्रा.डॉ.बाळासाहेब मुळीक
तत्त्वज्ञान विभाग,
शंकरराव मोहिते महाविद्यालय,
अकलूज

मूळ शोधताना आपणाला तत्त्वज्ञान या विषयाकडे ग सर्व विद्याशाखांचा विस्तार तत्त्वज्ञानामुळे झालेला ता सॉक्रेटिस यांच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्र संघाने णे १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक तत्त्वज्ञान २००२ पासून जागतिक पातळीवर विद्यापीठ व तरावर साजरा केला जातो.

तळीवर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीने सुख व समाधान शोधताना स्व हरवत आहे याची ते. केवळ भौतिक सुविधांवर माणसाचे माणूसपण र त्यासाठी तत्त्वज्ञानाची गरज आवश्यक आहे पण करता याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

ात तत्त्वज्ञानाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासाने जीवनातील सर्व समस्यांचे उत्तर मिळते. इंजिनिअरिंगच्या क्षेत्रात ठराविक संधी हमखासपणे यात दुमत नाही. अशा नोकरीच्या संधी तत्त्वज्ञान विषयात असतात काय? असा नेहमी प्रश्न निर्माण केला जातो त्यावेळी निश्चितच असे सांगता येईल की, खऱ्या अर्थाने प्रत्येक माणूस तत्वज्ञान जगत असतो. उपाशीपोटी तत्त्वज्ञान काय ऐकावे व सांगावे? अशावेळी उपाशी पोट सन्मार्गाने कसे भरावे याचे पूर्ण ज्ञान तत्त्वज्ञानातून मिळते.

तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकाचा वैचारिक पाया मजबूत होत असल्याने सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाचे योगदान मोलाचे दिसते.

तत्त्वज्ञानामध्ये अमूर्त संकल्पनांचा अभ्यास केला जातो. या अभ्यासाने माणसाची बुद्धी अधिक चिंतनशील बनते. विचार स्वातंत्र्य, नैतिकता, ज्ञानाविषयीचे सिद्धांत, जीवनातील मूल्य, कर्म सिद्धांत व वैज्ञानिक दृष्टिकोन अधिक बळकट होत जातो.याचाच फायदा दैनंदिन जीवनामध्ये होत असतो. धर्मश्रद्धा, अंधश्रद्धा, जादूटोणा व चमत्कार या गोष्टींना तत्त्वज्ञानाचा अभ्यासक तिलांजली देतो. उत्तम वक्ता, उत्तम प्रशासक तत्त्वज्ञानीच असतो तसेच तो, सामाजिक जबाबदारी उत्कृष्टपणे सांभाळतो. सद्गुणांचे पालनही तत्त्वज्ञानी करीत असतो म्हणून आज समाजातील विविध क्षेत्रांमध्ये तत्त्वज्ञानी असावेत असे वाटते. अलीकडे केंद्र शासनाने नवीन शैक्षणिक धोरणात तत्त्वज्ञान या विषयाचा अभ्यास सर्वांना कसा करता येईल यावर भर दिलेला आहे. समाजातील विविध क्षेत्रात तत्त्वज्ञानी माणसाची गरज आहे कारण तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने तार्किक बुद्धी. चिकाटी. धैर्य या गोष्टी व्यापक होतात. स्पर्धा परीक्षांमध्ये( एम.पी. एस. सी., यु .पी. एस. सी.) तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा उपयोग होतो. एक चांगला मार्गदर्शक सल्लागार व शिक्षक म्हणूनही तत्त्वज्ञान विषयाचा फायदा होतो. सामाजिक क्षेत्रामध्ये सेवा म्हणून जी क्षेत्रे आहेत त्या त्या क्षेत्रामध्ये तत्त्वज्ञानाचा पाया मजबूत असणारा माणूस यशस्वी होत असताना आपण पाहतो. वकिली व्यवसायाचा अभ्यास करताना तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावा लागतो.आयुर्वे दामध्येही तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावा लागतो. मानवी जीवन चांगल्या पद्धतीने जगावे जसे प्रत्येकास वाटते तशी तारतम्य बुद्धी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने वाढते हेही मान्य करावे लागते. तत्त्वज्ञानामध्ये मानवी दुः खांच्या मूळ कारणांची चर्चा करून आनंद प्राप्तीचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

शेवटी प्रत्येक माणसाचा प्रवास सुख आणि समाधान हाच आहे. त्यासाठी तत्त्वज्ञान उपयोगी पडते. कारण तत्त्वज्ञानामध्ये मूल्यांचा अभ्यास केला जातो आणि मानवी जीवन प्रवासात मूल्य हीच विधायक दिशा देतात.माणसाच्या जीवनात इष्ट आणि अनिष्ट या दोन गोष्टींचा पर्याय ज्या वेळेस समोर उभा राहतो त्यावेळेस माणसाने इष्टतेचा पर्याय निवडावा याचे ज्ञान तत्त्वज्ञान देते. तत्त्वज्ञानाच्या संकल्पनांमध्ये ज्ञान, भक्ती, कर्म यासारख्या जीवन उपयोगी सिद्धांताचा व संकल्पनांचा आपणाला उपयोग होतो. म्हणून आज खऱ्या अर्थाने सर्वांना तत्वज्ञानाची गरज आहे.

पुण्य नगरी
SMART
मंगळवार,२२ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालय नव उद्योजक निर्मितीचे केंद्र बनेल : डॉ.लड्ढा

## सोलापूर स्टार्टअप यात्रा : ध्यास नावीन्याचा शोध, नव उद्योजकांचा उपक्रम

**अकलूज / प्रतिनिधी**

शंकरराव मोहिते महाविद्यालयाने आजपर्यंत अनेक गौरवशाली उपक्रम राबवून जिल्ह्यामध्ये नावलौकीक मिळविला आहे. आज शासनाच्या स्टार्टअप यात्रेच्या निमित्ताने उद्योजक निर्मितीमध्ये पाऊल टाकले असून हे महाविद्यालय नव उद्योजक निर्मितीचे केंद्र बनेल, असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे इनोवेशन, इंक्युबेशन ॲण्ड लिंकेजेसचे संचालक डॉ. सचिन लड्ढा यांनी व्यक्त केले.



शंकरराव मोहिते महाविद्यालयात सोलापूर स्टार्टअप यात्रेप्रसंगी डॉ.सचिन लड्ढा, उद्योजक जितेंद्र बाजारे, विद्यापीठाच्या उद्यम इंक्युबेशन सेंटरचे मॅनेजर श्रीनिवास पाटील, श्रीनिवास नलगेशी, बसवराज सुतार, प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे, डॉ.विश्वनाथ आवड आदी.

शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज व इंक्युबेशन सेंटर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने 'सोलापूर स्टार्टअप यात्रा: ध्यास नाविन्याचा शोध नव उद्योजकांचा' या अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

जयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रेरणेने व शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निमंत्रक संस्थेमार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी उद्योजक जितेंद्र बाजारे, विद्यापीठाच्या उद्यम इंक्युबेशन सेंटरचे मॅनेजर श्रीनिवास पाटील, श्रीनिवास नलगेशी, बसवराज सुतार, प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांच्यासह १७५ पेक्षा अधिक विद्यार्थी व नवउद्योजक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम समन्वयक डॉ. विश्वनाथ आवड, डॉ.आण्णासाहेब नलावडे, डॉ.चंद्रशेखर ताटे-देशमुख, प्रा.विनायक माने, प्रा.शिवाजी राजगुरु, प्रा.नितीन साळुंखे, डॉ. विशाल साळुंखे, प्रा.जयंत माने, युवराज मालुसरे, नेहा माने, प्रकाश सुरवसे, भावना घोंगाणे, सायली मुंडफणे, वैष्णवी खिलारे, ऋतुजा पवार, भाग्यश्री सातपुते, स्वप्नील खंडागळे, समाधान इंगळे, कृष्णा जगताप, सुरज ननवरे, मारूती सुर्वे, समाधान वाघमोडे यांनी प्रयत्न केले. सुत्रसंचालन भावना घोंगाणे व नेहा माने यांनी केले.

ापूर, रविवार, २७ नोव्हेंबर २०२२ शहर-जिल्हा पुढारी

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात संविधान दिन

अकलूज : पुढारी वृत्तसेवा

येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे म्हणाले, धर्म, जात, भाषा, प्रादेशिकता अशी विविधता असलेल्या देशाला राज्यघटनेने बांधून ठेवले आहे. घटनकर्त्यांनी जगातील सर्वात चांगली घटना देशाला देण्याचा प्रयत्न केला. राज्यघटनेने एकात्मता निर्माण केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सरनामा वाचन करताना डॉ. विश्वनाथ आवड यांनी भारत नावाचा प्रदेश राज्यघटनेनंतर देश झाला ही भूमिका मांडली.



अकलूज : संविधान दिनानिमित्त शपथ घेताना विद्यार्थी.

याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेसह २६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्या शहिदांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांचे स्मरण करण्यात आले. राज्यघटनेचा सर्व भारतीयांनी सन्मान करुन प्रास्ताविकामधील मूल्यांना अंगी बाळगावे, असेही आवाहन करण्यात आले. संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे निमित्त साधून वेळापूर ऐतिहासिक वारसा प्रोजेक्ट रिपोर्ट पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये हितेश पूंज व प्रतीक फुले यांचा प्रथम क्रमांक आला होता. त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जनार्दन परकाळे यांनी केले. डॉ. अपर्णा कुचेकर, प्रा. राजकुमार इंगोले, युवराज मालुसरे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
बुधवार, दि. ३० नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवायचे असेल तर व्याकरण महत्त्वाचे : प्रा. बोधले

✓ सुराज्य/अकलूज

मराठी भाषा ही सहज आणि सोपी वाटत असली तरी या भाषेतील व्याकरण समजल्यानंतर या भाषेवर प्रभुत्व मिळवता येते यासाठी व्याकरण महत्त्वाचे आहे असे मत प्रा. प्रदीप बोधले यांनी व्यक्त केले.

अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय महर्षी प्रबोधिनी आयोजित पोलीस भरती लक्षसाठी एकदिवशिय मराठी व्याकरण सेमीनार मध्ये ते बोलत होते. शंकरराव मोहिते महाविद्यालयात शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील तसेच अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विविध उपक्रम आयोजित केले जातात. त्याच हेतुने महाराष्ट्र शासनाने नुकतीच मोठ्या प्रमाणावर पोलिस भरतीची जाहीरात काढलेली असून ग्रामीण भागातील विद्यार्थी यांना महर्षी प्रबोधिनीच्या माध्यमातून मराठी व्याकरण, सामान्य माहीती, तसेच विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेणेत येते त्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांचे नेतृत्वाखाली मोफत एकिदवशीय सेमीनारचे आयोजन करण्यात आले होते.



मराठी व्याकरणातील बारीक सारीक गोष्टी सहज सोप्या भाषेत जाणून घेण्यासाठी तसेच हा विषय सर्वच स्पर्धा परिक्षासाठी महत्वाचा असुन त्यातील नेमक्या ट्रीक समजून घेतल्या कि या पेपरमध्ये अधिकाधिक गुण मिळतात. त्या संदर्भात हा सेमीनार उपयुक्त ठरला असे सहभागींनी सांगितले. या सेमीनारचे आयोजन महर्षी प्रबोधिनीचे केंद्र समन्वयक डॉ. विश्वनाथ आवड तसेच प्रा. अनिल पराडे, प्रा. विनायक माने यांनी आयोजन केलेले होते. हे सेमीनार यशस्वी होण्यासाठी केंद्र संचालक प्रा. अजित चंदनकर, फिजीकल मास्टर सुरज झगडे यांनी प्रयत्न केले. या सेमिनारमध्ये महाविद्यालय व परीसरातील जवळपास ९० हून अधिक विदयार्थी सहभागी झालेले होते.

सुराज्य सोलापूर

शुक्रवार, दि. १८ नोव्हेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101




# शंकरराव मोहिते महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

सुराज्य/अकलूज : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, उपजिल्हा रुग्णालय आरोग्य समिती व आरोग्य विभागाच्या सहकार्याने महिला व मुलींची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. तहमीम आरिफ देशमुख यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी त्या मार्गदर्शन करताना म्हणाल्या, मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने व महत्त्वाच्या आजारांचे योग्य निदान करण्यासाठी अठरा वर्षावरील विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करणे महत्त्वाचे आहे, या उद्देशाने हे शिबिर आयोजित केले आहे. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना धन्यवाद दिले. याप्रसंगी अकलूज उपजिल्हा रुग्णालयातील तांत्रिक सहाय्यक सुंदर गायकवाड, लक्ष्मण चौगुले, संजना चव्हाण, सोनाली कोडलकर, आरोग्य सेवक पताळे, हिरवे सिस्टर, बागवान सिस्टर, आशा सुपरवायझर ओतारी मॅडम इत्यादी कर्मचा-यांनी सहभाग घेतला. या शिबिरात शंभर विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. दत्तात्रय मगर यांनी केले डॉ. सविता सातपुते यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. सज्जन पवार यांनी आभार मानले.

सुराज्य सोलापूर ८
रविवार, दि.१८ डिसेंबर २०२२

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालय वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण विजेते

✔ सुराज्य/अकलूज



सोलापूर विद्यापीठ सोलापूर आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टींग, पॉवरलिफ्टींग, शरीर सौष्ठव स्पर्धा अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात नुकत्याच संपन्न झाल्या.या स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर बॉडी बिल्डीग असोसिएशनचे सचिव प्रमोद काटे, सोलापूर वेटलिफ्टींग असोसिएशनचे सचिव संतोष गवळी यांच्या हस्ते झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे हे होते.

यावेळी विद्यापीठ संघ निवड समितीचे चेअरमन डी. के.देशमुख, सदस्य एन.के.देशपांडे, डॉ.बी.एस.भोसले तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर आंतर महाविद्यालयीन क्रीडा परिषदेचे सचिव विजय दत्तू,क्रीडा संचालक बाळासाहेब वायचवरे दत्तात्रय बिराजदार, पात्रता समितीचे सदस्य एस.व्ही मोरे उपस्थित होते.

मुले ५५ किलो प्रकाश कचरे अकलूज (प्रथम)६१ किलो राऊत वैभव बार्शी (प्रथम), ७३ किलो सुमित मोरे सांगोला (प्रथम) ८१ किलो सिध्दांत बिंदे सोलापूर (प्रथम) ८९ किलो ज्ञानराज जाधव अकलूज (प्रथम),९६ किलो ऋतुराज गायकवाड नातेपुते (प्रथम),१०२ किलो धीरज सरगर बार्शी (प्रथम),१०९ किलो नवनाथ भोसले वेळापूर (प्रथम),

या स्पर्धेचे पंच म्हणून आर. एस.लोंढे,बी.बी.पाटील,यु. एम.भिंगे,शेषराज घाडगे,समाधान बंडगर,समाधान माने यांनी काम पाहिले.

### मुली वेटलिफ्टिंग

४५ किलो नम्रता कुंभार सोलापूर (प्रथम), ४९ किलो स्वप्नाली घोरपडे वेळापूर (प्रथम), ५५ किलो प्रगती कदम अकलूज (प्रथम), ५९किलो अंकिता भगत अकलूज(प्रथम), ६४ किलो करीना शेख बार्शी (प्रथम), ७१ किलो पुनम देवकते वेळापूर (प्रथम), ७६ किलो वैभवी साळुंखे अकलूज (प्रथम), ८७ किलो साईप्रिया किट्टद सोलापूर (प्रथम), ८७+ अनुश्री फुले अकलूज (प्रथम),

### पावर लिफ्टिंग मुली

४७ किलो सुमित्रा पिसे वेळापूर (प्रथम),५२ किलो दिपाली सुर्वे सोलापूर (प्रथम),५७ किलो प्रगती कदम अकलूज (प्रथम), ६३ किलो करीना शेख बार्शी (प्रथम),७२ किलो पुनम देवकते वेळापूर (प्रथम),८४ किलो वैभवी माने अकलूज (प्रथम),८४+ किलो अनुश्री फुले अकलूज (प्रथम),

### शरीरसौष्ठव मुले

६०किलो गवारे योगेश बार्शी (प्रथम),६५ किलो शुभम जगताप सोलापूर (प्रथम), ७० किलो रोहन गवळी सोलापूर (प्रथम), ७५ किलो प्रथम अभिक नदाल सोलापूर (प्रथम), ८० किलो प्रथम रियाल कोरबू अकलूज (प्रथम), ८५ किलो विशाल सुरवसे पंढरपूर (प्रथम), ९० किलो शुभम बनसोडे पंढरपूर (प्रथम), ९०+ आकाश सुरवसे सोलापूर (प्रथम)

वरील स्पर्धा पार पाडण्यासाठी शंकरराव मोहिते महाविद्यालयातील स्टाफ प्रताप क्रीडा मंडळ खेळाडू सहकार्य केले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.अरविंद वाघमोडे यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.दादासाहेब कोकाटे तर डॉ.बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले.

दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
सोलापूर. रविवार, १८ डिसेंबर २०२२ | मार्गशीर्ष कृ.१०, शके १९४४

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413101

**क्रीडा स्पर्धा** • शरीरसौष्ठव, वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंगच्या स्पर्धा

# अकलूजला क्रीडा स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद

प्रतिनिधी | निमगाव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग, शरीरसौष्ठव स्पर्धा अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात होऊन याच महाविद्यालयांनी स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपद मिळवले.

या स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सचिव प्रमोद काटे, सोलापूर वेटलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संतोष गवळी यांच्या हस्ते झाले.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते.यावेळी विद्यापीठ संघ निवड समितीचे चेअरमन डी. के. देशमुख, सदस्य एन. के. देशपांडे, डॉ. बी. एस. भोसले, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर आंतर महाविद्यालयीन क्रीडा परिषदेचे सचिव विजय दत्तू, क्रीडा संचालक बाळासाहेब वाघचवरे, दत्तात्रय बिराजदार, पात्रता समितीचे सदस्य एस. व्ही. मोरे उपस्थित होते.

या स्पर्धेचे पंच म्हणून आर. एस. लोंढे, बी.बी. पाटील, यू. एम. भिंगे, शेषराज घाडगे, समाधान बंडगर, समाधान माने यांनी काम पाहिले.

प्रास्ताविक प्रा. अरविंद वाघमोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दादासाहेब कोकाटे तर डॉ. बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले. या विजयी स्पर्धकाचे शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शन संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील यांनी अभिनंदन केले.

## शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयच यजमान



## विविध वयोगटातील विजेते खेळाडू

या स्पर्धेत वेटलिफ्टिंग मुलांमध्ये ५५ किलो प्रकाश कचरे अकलूज प्रथम, ६१ किलो राऊत वैभव बार्शी प्रथम, ७३ किलो सुमित मोरे सांगोला प्रथम, ८१ किलो सिध्दांत बिंदे सोलापूर प्रथम, ८९ किलो ज्ञानराज जाधव अकलूज प्रथम,९६ किलो ऋतुराज गायकवाड नातेपुते प्रथम,१०२ किलो धीरज सरगर बार्शी प्रथम,१०९ किलो नवनाथ भोसले वेळापूर प्रथम, मुलींमध्ये ४५ किलो नम्रता कुंभार सोलापूर प्रथम,४९ किलो स्वप्नाली घोरपडे वेळापूर प्रथम,५५ किलो प्रगती कदम अकलूज प्रथम,५९किलो अंकिता भगत अकलूज प्रथम,६४ किलो करीना शेख बार्शी प्रथम,७१ किलो पुनम देवकते वेळापूर प्रथम,७६ किलो वैभवी साळुंखे अकलूज प्रथम,८७किलो साईप्रिया किट्टद सोलापूर प्रथम,८७+ अनुश्री फुले अकलूज प्रथम, पावर लिफ्टिंग मुलींमध्ये ४७ किलो सुमित्रा पिसे वेळापूर प्रथम,५२ किलो दिपाली सुर्वे सोलापूर प्रथम,५७ किलो प्रगती कदम अकलूज प्रथम,६३ किलो करीना शेख बार्शी प्रथम,७२ किलो पुनम देवकते वेळापूर प्रथम,८४ किलो वैभवी माने अकलूज प्रथम,८४+ किलो अनुश्री फुले अकलूज प्रथम,शरीरसौष्ठव मध्ये मुले ६०किलो गवारे योगेश बार्शी प्रथम,६५ किलो शुभम जगताप सोलापूर प्रथम,७० किलो रोहन गवळी सोलापूर प्रथम,७५ किलो प्रथम अभिक नदाल सोलापूर प्रथम,८० किलो प्रथम रियाल कोरबू अकलूज प्रथम,८५ किलो विशाल सुरवसे पंढरपूर प्रथम,९० किलो शुभम बनसोडे पंढरपूर प्रथम, ९०+ आकाश सुरवसे सोलापूर प्रथम हे विजेते ठरले.

क्रीडासंचार

सोलापूर, सोमवार, १९ डिसेंबर २०२२ संचार

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# मोहिते महाविद्यालयात विविध स्पर्धा संपन्न

**संचार वृत्तसेवा**





**अकलूज, दि.१८** - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग, शरीर सौष्ठव स्पर्धा अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात नुकत्याच संपन्न झाल्या.

या स्पर्धेचे उद्‌घाटन सोलापूर बॉडी बिल्डींग असोसिएशनचे सचिव प्रमोद काटे, सोलापूर वेटलिफ्टींग असोसिएशनचे सचिव संतोष गवळी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. यावेळी विद्यापीठ संघ निवड समितीचे चेअरमन डी.के. देशमुख, सदस्य एन.के.देशपांडे, डॉ.बी.एस. भोसले विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन क्रीडा परिषदेचे सचिव विजय दत्तू, क्रीडा संचालक बाळासाहेब वाघचवरे दत्तात्रय बिराजदार, पात्रता समितीचे सदस्य एस.व्ही. मोरे उपस्थित होते.

स्पर्धेत वेटलिफ्टिंगमध्ये मुले गटात ५५ किलोमधून प्रकाश कचरे अकलूज, ६१ किलो वैभव राऊत बार्शी, ७३ किलो सुमित मोरे सांगोला, ८१ किलो सिध्दांत बिंदे सोलापूर, ८९ किलो ज्ञानराज जाधव अकलूज, ९६ किलो ऋतुराज गायकवाड नातेपुते, १०२ किलो धीरज सरगर बार्शी, १०९ किलोमधून नवनाथ भोसले वेळापूर यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

मुली : वेटलिफ्टिंगमध्ये ४५ किलो नम्रता कुंभार सोलापूर, ४९ किलो स्वप्नाली घोरपडे वेळापूर, ५५ किलो प्रगती कदम अकलूज, ५९किलो अंकिता भगत अकलूज, ६४ किलो करीना शेख बार्शी, ७१ किलो पुनम देवकते वेळापूर, ७६ किलो वैभवी साळुंखे अकलूज, ८७ किलो साईप्रिया किट्टद सोलापूर, ८७ + अनुश्री फुले अकलूज यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

पॉवर लिफ्टिंग मुली : ४७ किलो सुमित्रा पिसे वेळापूर, ५२ किलो दीपाली सुर्वे सोलापूर, ५७ किलो प्रगती कदम अकलूज, ६३ किलो करिना शेख बार्शी, ७२ किलो पुनम देवकते वेळापूर, ८४ किलो वैभवी माने अकलूज, ८४ + किलो अनुश्री फुले अकलूज यांनी तर शरीरसौष्ठव मुले : ६० किलो योगेश गवारे बार्शी, ६५ किलो शुभम जगताप सोलापूर, ७० किलो रोहन गवळी सोलापूर, ७५ किलो प्रथम अभिक नदाल सोलापूर, ८० किलो रियाल कोरबू अकलूज, ८५ किलो विशाल सुरवसे पंढरपूर, ९० किलो शुभम बनसोडे पंढरपूर, ९०+ आकाश सुरवसे सोलापूर यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

पंच म्हणून आर.एस.लोंढे, बी.बी.पाटील, यू.एम.भिंगे, शेषराज घाडगे, समाधान बंडगर, समाधान माने यांनी काम पाहिले. प्रस्ताविक प्रा.अरविंद वाघमोडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.दादासाहेब कोकाटे यांनी केले. डॉ. बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले. स्पर्धकांचे शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शन संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

जनमत सर्वसामान्यांचे
सोमवार, १६ जानेवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात भूगोल दिनाचे आयोजन

पिलीव, दि.१५ (प्रतिनिधी)– शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज भूगोल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम ाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून समीर गांधी महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख प्रा. संतोष माने सर हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बागडे डी.एस हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात भूगोल दिनाचे महत्त्व व भूगोल विषयातील संधी या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत विद्यार्थ्यांनी आपली ध्येय निश्चित करावी व भविष्यात त्या ध्येयाला अनुसरून आपले कार्य करावे असे आव्हान केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनात शिस्तीचे पालन केले व भविष्यामध्ये आपल्याला येणाऱ्या संधी जाणून घेतल्या तर आपलं जीवन नक्कीच उज्वल झाल्याशिवाय राहणार नाही. अशा प्रकारचे वक्तव्य करून विद्यार्थ्यांनी नियमितपणे दररोज वर्तमानपत्रे, मासिके यांचे वाचन करून समाजाला ज्या गोष्टीची गरज आहे. अशा क्षेत्रात आपला नाव लौकिक करावा. असे सांगितले. या कार्यक्रमात भूगोल विभाग प्रमुख डॉ.संतोष गुजर यांनी विभागात राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली या कार्यक्रमा वेळी भूगोल विभागातील डॉ. चंद्रशेखर ताटे, डॉ. चंकेश्वर लोंढे, प्रा. स्मिता पाटील, प्रा. रविराज सोनवणे व भूगोल विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागातील विद्यार्थिनी कु. पूर्वा एकतपुरे हिने, तर भूगोल दिनाचे महत्त्व शुभम एकतपुरे याने,सूत्रसंचलन राज टिळेकर याने तर आभार प्रदर्शन कु. साक्षी ठोकळे हिने केले.हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी भूगोल विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
सोमवार, दि. १६ जानेवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101



# श्रमसंस्कार शिबीरातून युवकांचे उज्वल भविष्य घडते ; जयसिंह मोहिते-पाटील

सुराज्य/अकलूज

श्रमसंस्कार शिबीरातून युवकांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो.आज सर्वांना हक्काची जाणीव आहे पण कर्तव्याची जाणीव नाही.आज सर्व शिबीरार्थींचा आत्मविश्वास वाढलेला आहे व कर्तव्याची जाणीवही झालेली आहे.अशा शिबिरातून युवकांचे उज्वल भविष्य घडते अशा शिबीरांची देशाला गरज आहे असे मत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

मौजे चाकोरे येथे शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते.

अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकासविशेष श्रमसंस्कार सात दिवसांचे शिबीर मौजे चाकोरे येथे संपन्न झाले.या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावात ग्रामस्वच्छता,वृक्षारोपण व वृक्षदिंडी,श्रमदानातून वनराई बंधारा बांधणे,चक्रेश्वर मंदिर,विठोबा पाटील,जि.प.शाळा,निरा नदी याट परिसरात स्वच्छता व श्रमदान केले.या दरम्यान महिला मेळावा,संमोहनशास्त्र, जादूचे प्रयोग,भारुड,सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.या कालावधीत डॉ.विश्वनाथ आवड,डॉ.लक्ष्मण आसबे,प्रा.धनंजय देशमुख,जितेंद्र बाजारे, सुमित भोसले यांची वैचारिक व्याख्याने संपन्न झाली.

यावेळी व्यासपीठावर चक्रेश्वर माध्यमिक विद्यालयाचे सभापती किसन भिताडे, शिवामृतचे संचालक हनुमंत शिंदे,युवानेते राहुल वायमोडे,सहकार महर्षी सहकारी साखर कारखाना शंकरनगरचे संचालक लक्ष्मण शिंदे,सरपंच नवनाथ जाधव,उपसरपंच सचिन कचरे,चंद्रकांत शिंदे,सागर वरकड,डॉ.चंकेश्वर लोंढे,डॉ.बाळासाहेब मुळीक आदी उपस्थित होते.

यावेळी हितेश पुंज,स्नेहा मगर,किरण भांगे यांनी आपल्या मनोगतातून शिबीरातील आपले अनुभव व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.दत्तात्रय मगर यांनी केले,तर सूत्रसंचालन डॉ.विजयकुमार शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.बलभीम काकुळे यांनी मानले. हे श्रमसंस्कार शिबीर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.सज्जन पवार,डॉ.सविता सातपुते यांनी परिश्रम घेतले.

दैनिक दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
सोलापूर शहर ▪ बार्शी ▪ माळशिरस ▪ माढा ▪ करमाळा ▪ सांगोला ▪ अक्कलकोट ▪ पंढरपूर ▪ मोहोळ ▪ मंगळवेढा

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

## दान पावलं... वासुदेवासोबत जयसिंहांचा ठेका



अकलूज. सहकारमहर्षी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील हे चाकोरे येथे गेले असता. जयसिंहांनी वासुदेवासोबत दान पावलं देवा दान पावलं म्हणत ठेका धरला. लोककलेच्या जपणुकीसाठीते अकलूजला लेझीम स्पर्धा घेतात. २५ वर्षे लावणी स्पर्धाही घेतली. छाया : राजू मुलाणी, अकलूज.

सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. २८ जानेवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101
Library

# मोहिते महाविद्यालयाच्या खेळाडूंची शालेय राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

✓ सुराज्य/अकलूज : पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे विभागीय शालेय मैदानी स्पर्धा संपन्न झाली. त्यामध्ये अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील खेळाडूंनी १९ वर्षे वयोगटात मुले ४÷१०० व ४÷४००मीटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. या खेळाडूंची बालेवाडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशस्वी खेळाडूमध्ये सुमित दत्तू परांडे, अभिषेक लक्ष्मण राजगे, समाधान मनोहर सावंत, किरण लाला वीरकर, खाडे ओंकार सुरेश खाडे, जय शिवाजी शिंदे या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते- पाटील, संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे महाविद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय बागडे, पर्यवेक्षक राजकुमार इंगोले तसेच सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

रविवार today
सकाळ
सोलापूर, रविवार, २९ जानेवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

## अकलूजच्या खेळाडूंची मैदानी स्पर्धेसाठी निवड

**अकलूज, ता. २८ :** शंकरराव मोहिते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले असून त्यांची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या पुणे विभागीय शालेय मैदानी स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात मुले ४×१०० व ४×४०० मीटर रिले स्पर्धेत यश मिळविले. यामध्ये सुमित परांडे, अभिषेक राजगे, समाधान सावंत, किरण वीरकर,ओंकार खाडे,जय शिंदे यांनी प्रथम क्रमांक मिळविला असून या खेळाडूंची बालेवाडी येथे होणा-या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, सोमवार, दि. ६ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101




'संघर्ष' या आत्मचरित्र प्रकाशनप्रसंगी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, ताराचंद आवळे, डॉ. आबासाहेब देशमुख, डॉ. बसवराज शिवपुजे, शीतल राणे, डॉ नितीन राणे आदी.

# 'संघर्ष' या आत्मचरित्र पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकलूज :** शालेय ते वैद्यकीय शिक्षण, अशा जीवनातील खडतर प्रवासात डॉ. राजीव राणे यांनी जो संघर्ष केला आहे, त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'संघर्ष' हे पुस्तक असल्याचे मत आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

अकलूज येथील कृष्णप्रिया मल्टिफंक्शन हॉलमधे अकलूजच्या वैद्यकीय क्षेत्रातील बालरोगतज्ज्ञ डॉ. राजीव राणे यांच्या जीवन प्रवासावर आधारित 'संघर्ष' या आत्मचरित्र पुस्तकाचे प्रकाशन आमदार मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'संघर्ष' या आत्मचरित्राचे लेखक ताराचंद आवळे, प्राचार्य महासंघाचे राज्याध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, शीतल राणे, डॉ. नितीन राणे, डॉ. मनीष राणे, डॉ. रेवती राणे, डॉ. स्नेहल राणे यांच्यासह वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आयुष्यात अनेकांनी मला साथ, माया, प्रेम व उभारी दिली. त्यामुळेच मी गेल्या ६९ वर्षांच्या जीवन प्रवासात यशस्वी झालो, तसेच आजवरचा यशस्वी प्रवास करू शकलो, अशी भावना डॉ. राजीव राणे यांनी व्यक्त केली, तसेच माझे वडील हेच माझे आयडॉल होते. त्यांच्यामुळे आम्ही घडलो, असे डॉ. नितीन राणे यांनी सांगितले.

याप्रसंगी फलटणचे माजी प्राचार्य रवींद्र येवले. डॉ. एम.के. इनामदार, डॉ. विद्युत शहा, डॉ. अंजली कदम, नंदकुमार कैंगार यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. सुधीर पोफळे यांनी केले, तर आभार डॉ. मनीष राणे यांनी मानले. (वा.प्र.)

राजदंड

epaper.rajdand.com
06 Feb 2023 - Page 4

# शालेय जीवनात मिळालेल्या संधीचे मुलांनी सोने करावे : स्वरूपाराणी मोहिते-पाटील

अकलूज : कृष्णा लावंड

खंडाळी (ता.माळशिरस) येथील सत्यजित बाळू चव्हाण याने दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी पथ संचलनामध्ये सहभागी होऊन माळशिरस तालुक्या बरोबर सोलापूर जिल्ह्याची मान उंचावली आहे.तो अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात बी.ए.व्दितीय वर्षात शिक्षण घेत आहे.आज त्याचे खंडाळी गावामध्ये आगमन होताच हालगीच्या कडकडाटात त्याचे जंगी स्वागत करण्यात आले.



त्या पुढे म्हणाल्या की,संस्थेचे माजी अध्यक्ष बाळदादा यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. आणि या कार्यक्रमाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांना आपल्या विविध कलागुणांना वाव मिळत असतो आणि यातूनच विद्यार्थी घडत असतात त्याचेच एक उदाहरण म्हणजे शंकरराव मोहिते महाविद्यालयातून आजपर्यंत जवळजवळ २८ विद्यार्थी या राजपथावरती संचलनासाठी गेलेले आपणास दिसून येतात. त्याचबरोबर अनेक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळालेले आहेत आणि खऱ्या अर्थाने या विद्यार्थ्यांनी आपल्या गावाबरोबर आणि आई- वडिलांबरोबरच शिक्षण प्रसारक मंडळाचे नाव अगदी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत पोहोचवलेले आपल्याला पाहायला मिळते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दिल्लीत पथसंचलन करून परतल्यानंतर स्वयंसेवक सत्यजित चव्हाण याचे खंडाळी गावामध्ये गावकऱ्यांनी व मित्र परिवाराने जंगी स्वागत करून गावातून मिरवणूक काढली.

दि. २६ जानेवारी २०२३ रोजी दिल्ली येथे झालेल्या पथ संचलनामध्ये शंकरराव मोहिते महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचा सत्यजित बाळू चव्हाण यांने महाराष्ट्र टिमचे नेतृत्व केले तो दिल्लीहून परतल्यानंतर दिनांक २ फेब्रुवारी २०२३ रोजी गावकऱ्यांनी व मित्रपरिवार त्याचे जंगी स्वागत केले व त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या कार्यक्रमा वेळी प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते सत्यजित चव्हाणच्या आई वडिलांचा देखील सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी खंडाळी गावच्या सरपंच सुनिता सुरवसे, उपसरपंच सुरेखा पताळे,दत्तात्रय रिसवडकर,रावसाहेब भोसले ॲड.शहाजी इंगवले देशमुख,अविनाश पताळे,अमर रिसवडकर,महेश पठाडे,नाना चंदनकर,अनिलभोसले,मिलिंदखरात,शिवाजी शिंदे,उज्वला सगट,तब्बुसूम सय्यद,कल्याण जाधव,महबूब सय्यद,अतुल सगट,योगेश आबराव,सुधाकर सगट,अण्णा कांबळे,सुरेश सुरवसे,महाविद्यालयातील डॉ.चंकेश्वर लोंढे,डॉ.सज्जन पवार,प्रा.नंदकुमार गायकवाड तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै.संचार-लक्ष्मीकांत कुरुडकर.

# दिल्लीतील पथ संचलनात सहभागी झालेल्या सत्यजितचे जंगी स्वागत



▶ **संग्रामनगर, दि.५ -** खंडाळी (ता.माळशिरस) येथील सत्यजित वाळू चव्हाण याने नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी पथ संचलनामध्ये सहभागी होऊन माळशिरस तालुक्यावरोवर सोलापूर जिल्ह्याची मान उंचावली आहे. तो अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात बी.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. त्याचे खंडाळी गावामध्ये आगमन होताच हलगीच्या कडकडाटात जंगी स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी स्वरुपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या की, संस्थेचे माजी अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातूनच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळत असतो आणि यातूनच ते घडत असतात. त्याचेच एक उदाहरण म्हणजे शंकरराव मोहिते महाविद्यालयातून आजपर्यंत २८ विद्यार्थी या राजपथावरती संचलनासाठी निवडले गेले आहेत. अनेक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळालेले आहेत आणि खऱ्या अर्थाने या विद्यार्थ्यांनी आपल्या गावाबरोबर आणि आई-वडिलांबरोबरच शिक्षण प्रसारक मंडळाचे नाव अगदी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत पोहोचवले आहे.

कार्यक्रमासाठी सरपंच सुनीता सुरवसे, उपसरपंच सुरेखा पताळे, दत्तात्रय रिसवडकर, रावसाहेब भोसले, ॲड.शहाजी इंगवले देशमुख, अविनाश पताळे, अमर रिसवडकर, महेश पठाडे, नाना चंदनकर, अनिल भोसले, मिलिंद खरात, शिवाजी शिंदे, उज्वला सगट, तब्वसूम सय्यद, कल्याण जाधव, महबूब सय्यद, अतुल सगट, योगेश आवराव उपस्थित होते.

सकाळ
शनिवार, २८ जानेवारी २०२३
TODAY

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

## शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

अकलूज : शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये सचिव अभिजित रणवरे यांच्या हस्ते ध्वजावंदन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ दत्तात्रेय बागडे यांनी केले यावेळी बी. एड. महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.जयश्री धुमाळ, बी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल भानवसे, डी.फार्मसी प्राचार्य नानासाहेब देवडकर आदी उपस्थित होते. एनसीसी विभागाचे प्रमुख प्राध्यापक नंदकुमार गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली एनसीसी युनिट संचलन दिमाखदारपणे पार पडले. सूत्रसंचालन प्रा. अनिल पराडे यांनी केले.

जनमत सर्वसामान्यांचे

रविवार, २९ जानेवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj - 413101

# अकलूज येथे शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये ७४ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

संग्रामनगर दि.२८ (प्रतिनिधी)- भारत देश महासत्ता बनायचा असेल तर प्रत्येक तरूण विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी माजी राष्ट्रपती डॉ एपीजे अब्दुल कलाम व महात्मा गांधी यांच्या विचारानुसार वाटचाल केली पाहिजे असे मत शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे सचिव अभिजित रणवरे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले. पुढे त्यांनी विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षण प्रसारक मंडळ विविध उपक्रम राबविले जातात याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालये प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे हे होते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताची कृषी,औद्योगिक व सेवा क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झाली आहे.भारत देश महासत्ता बनण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त अंगीकारून प्रत्येक क्षेत्रात आपले नाव उज्वल केले पाहिजे असे मत अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी व्यक्त केले



या कार्यक्रमासाठी बी.एड.महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. जयश्री धुमाळ,बी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल भानवसे,डी.फार्मसी प्राचार्य नानासाहेब देवडकर , प्राध्यापक वृंद विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी एनसीसी विभागाचे प्रमुख प्राध्यापक नंदकुमार गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली एनसीसी युनिट संचलन दिमाखदार संपन्न झाले.या कार्यक्रमांचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.अनिल पराडे यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
…पूर ▪ उत्तर सोलापूर ▪ मोहोळ ▪ मंगळवेढा ▪ बार्शी ▪ माळशिरस ▪ माढा ▪ करमाळा ▪ सांगोला ▪ अक्कलकोट ▪ पंढरपूर    सोलापूर. गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



**जीवनप्रवास • अकलूजमध्ये आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते डॉ. राजीव राणे यांच्या चरित्रग्रंथाचे झाले प्रकाशन**

# डॉ. राजीव राणेंचा शालेयपासून वैद्यकीय शिक्षणापर्यंतचा जीवन 'संघर्ष'

प्रतिनिधी | अकलूज

शालेय शिक्षण ते वैद्यकीय शिक्षण अशा जीवनातील खडतर प्रवासात डॉ. राजीव राणे यांनी जो संघर्ष केला, त्याचे प्रतिबिंब संघर्ष या पुस्तकात मांडण्यात आले आहे. समाजाशी संघर्ष करून शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या डॉ. राजीव राणे यांचे जीवन युवकांसाठी आदर्श आहे, असे मत आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले. अकलूज येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. राजीव राणे यांच्या संघर्ष या आत्मचरित्राचे प्रकाशन आमदार रणजितसिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी संघर्ष या चरित्राचे लेखक ताराचंद आवळे, प्राचार्य महासंघाचे राज्याध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे, शितलदेवी राणे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. नितीन राणे, बालरोगतज्ज्ञ डॉ. मनीष राणे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रेवती राणे, रेडिओलॉजिस्ट डॉ. स्नेहल राणे यांच्यासह वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

लेखक ताराचंद आवळे म्हणाले, कोकणातील खेड्यात जन्मलेला व गणिताची आवड असणारा विद्यार्थी मेडिकल क्षेत्रात जातो आणि बालरोगतज्ज्ञ होतो ही बाब साधी नाही. डॉ. राजीव राणे हे संघर्षाचा खजिना आहेत. त्यांच्या संघर्षमय जीवनाची वाटचाल या पुस्तकात मांडण्याचा आपण प्रयत्न केला आहे.

या वेळी फलटणचे माजी प्राचार्य रवींद्र येवले यांनी डॉ. राजीव राणे यांच्या जीवनाचा संघर्ष मांडला. डॉ. एम. के. इनामदार, डॉ. विद्युत शहा, डॉ. अंजली कदम, नंदकुमार केंगार यांनीही मनोगत व्यक्त केली. सूत्रसंचालन डॉ. सुधीर पोफळे व डॉ. अमित शेटे यांनी केले. डॉ. मनीष राणे यांनी आभार मानले.

### अनेकांच्या पाठबळावर प्रवास

शिक्षणातील अडीअडचणी, सावंत गुरुजींचे सहकार्य व मेडिकल क्षेत्रात काजळे व अकलूजकर कुटुंबाने दिलेली साथ यामुळेच मी आजवरचा यशस्वी प्रवास करू शकलो. अनेकांनी मला नैतिक पाठबळ व प्रेम दिले. त्यामुळेच यशस्वी झालो, असे डॉ. राणे म्हणाले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

जनमत सर्वसामान्यांचे
बुधवार, ०८ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# डॉ.राजीव राणे यांच्या सारख्या फॅमिली डॉक्टरची आज समाजाला नितांत गरज : आ. रणजितसिंह मोहिते पाटील




अकलूज, दि.०७ (प्रतिनिधी)– डॉ.राजीव राणे यांनी आयुष्याच्या वाटचालीत जो संघर्ष केला . त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे संघर्ष हे पुस्तक आहे . त्यांच्या सारख्या फॅमिली डॉक्टरची आज समाजाला गरज आहे असे मत आ रणजितसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले .

डॉ राजीव राणे यांच्या प्रभावशाली व्यक्तिमत्वाच्या जीवन प्रवासावर आधारित संघर्ष या आत्मचरित्राचे प्रकाशन आ मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले . त्याप्रसंगी आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात त्यांनी डॉ राजीव राणे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

संघर्ष या आत्मचरित्राचे लेखक ताराचंद आवळे म्हणाले , कोकणातील खेड्यात जन्मलेला व गणिताची आवड असणारा विद्यार्थी मेडिकल क्षेत्रात जातो आणि बालरोगतज्ज्ञ होतो . डॉ राजीव राणे म्हणजे संघर्षाचा खजीना आहे . हा संघर्ष मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे .

आयुष्यात अनेकांनी मला साथ दिली , उभारी दिली त्यामुळेच गेल्या ६९ वर्षाचा यशस्वी प्रवास मी करु शकलो . शिक्षणातील अडचणी , सावंत गुरुजींचे सहकार्य व मेडिकल क्षेत्रात काजळे , अकलूजकर कुटुंबाने दिलेली साथ यामुळेच मी आजवरचा यशस्वी प्रवास करु शकलो असे डॉ राजीव राणे यांनी सांगितले .

माझे वडील हेच माझे आयडॉल होते . त्यामुळेच आम्ही घडलो असे डॉ नितीन राणे यांनी सांगितले .

फलटणचे माजी प्राचार्य रविन्द्र येवले सरांनी नेमक्या शब्दात डॉ राजीव राणे यांच्या जीवनाचा संघर्ष मांडला .

डॉ एम के इनामदार , डॉ विद्युत शहा , नंदकुमार केंगार यांनी आपले विचार मांडले .

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ बसवराज शिवपुजे , डॉ आबासाहेब देशमुख , शीतल राणे , डॉ अंजली कदम , डॉ नितीन राणे , डॉ मनिष राणे , डॉ रेवती राणे , डॉ स्नेहल राणे यांच्यासह वैद्यकीय , सामाजिक , शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते . डॉ सुधीर पोफळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले .

जनमत सर्वसामान्यांचे

गुरूवार, ०९ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# कॉलेज जीवनाचा युवकांनी मनसोक्तपणे आनंद घ्या : जयसिंह मोहिते पाटील

संग्रामनगर दि.०८ (प्रतिनिधी)- अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय कॅडेट कोअर, जिमखाना विभाग आणि सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

सन २०२२ ते २०२३ या वर्षभरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविला त्या ७५ विदयार्थ्यांचा याप्रसंगी प्रमाणपत्र व ट्रॉफी देवुन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना जयसिंह मोहिते पाटील म्हणाले कि, प्रत्येक व्यक्तीकडे कोणती तरी कला असायला हवी ती आपणास जगण्याची उर्जा निर्माण करून देते. केवळ महाविद्यालय शिकत बसू नका तर कॉलेज जीवनात स्वतः चे छंद जोपासत आनंदी जगण्याचा प्रयत्न करा, कारण हे जीवन पुन्हा मिळत नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सर्वच क्षेत्रात पारंगत होण्यासाठी प्रयत्न करून स्वताचे व्यक्तीमत्व घडवावे असे अवाहनही त्यांनी यावेळी केले. आपल्या महाविद्यालयीन जीवनातले अनेक प्रसंग विदयार्थ्यांना त्यांनी रंजक पध्दतीने सांगितले नवनवीन शिकत रहा, पारंपरीक शिक्षणाबरोबरच स्वत:ला घडवायला शिका, हजरजबाबीपणा अंगिकारा, पुस्तके वाचा, ग्रंथालयाची माहीती घ्या, विविध प्रकारचे खेळ खेळा जास्तीत जास्त ट्रेस फ्रि राहण्याचा प्रयत्न करा असेही अवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी शिक्षण प्रसारक मंडळाचे व महाविदयालय विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे आणि संचालिका कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने चौफेर यश मिळविले आहे याबाबतचा अहवाल आपल्या मनोगतामध्ये सादर केला.

या कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राजाभाऊ लव्हाळे, मनोज रेळेकर, प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे, प्रा. हणमंत आवताडे उपस्थित होते.

या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी सन्मान क्रिडा यादीचे वाचन प्रा.अरविंद वाघमोडे, सांस्कृतिक विभाग यादीचे




वाचन डॉ.विश्वनाथ आवड, एन.सी.सी. विभाग यादीचे वाचन प्रा.नंदकुमार गायकवाड यांनी केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. दत्तात्रय बारबोले यांनी केले तर आभार प्रा.अनिल पराडे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सिनीयर व ज्युनियर विभागातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी ऑफिस अधिक्षक युवराज मालुसरे व त्यांचे सर्व सहकारी यांनी प्रिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101



# कॉलेज जीवनाचा युवकांनी आनंद घ्यावा : मोहिते-पाटील

✔ सुराज्य/अकलूज

प्रत्येक व्यक्तीकडे कोणती तरी कला असायला हवी ती आपणास जगण्याची उर्जा निर्माण करून देते.केवळ महाविद्यालय शिकत बसू नका तर कॉलेज जीवनात स्वतःचे छंद जोपासत आनंदी जगण्याचा प्रयत्न करा,कारण हे जीवन पुन्हा मिळत नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सर्वच क्षेत्रात पारंगत होण्यासाठी प्रयत्न करून स्वताचे व्यक्तीमत्व घडवावे. नवनवीन शिकत रहा,पारंपरीक शिक्षणाबरोबरच स्वत:ला घडवायला शिका, हजरजबाबीपणा अंगिकारा, पुस्तके वाचा, ग्रंथालयाची माहीती घ्या, विविध प्रकारचे खेळ खेळा जास्तीत जास्त ट्रेस फ्रि राहण्याचा प्रयत्न करा असे मत शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय कॅडेट कोअर, जिमखाना विभाग आणि सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

सन २०२२ ते २०२३ या वर्षभरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविला त्या ७५ विदयार्थ्यांचा याप्रसंगी प्रमाणपत्र व ट्रॅाफी देवुन सन्मान करण्यात आला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी शिक्षण प्रसारक मंडळाचे व महाविदयालय विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे आणि संचालिका कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने चौफेर यश मिळविले आहे. याबाबतचा अहवाल आपल्या मनोगतामध्ये सादर केला.या कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राजाभाऊ लव्हाळे, मनोज रेळेकर, प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे, प्रा.हणमंत आवताडे उपस्थित होते.

पुण्य नगरी SMART
शुक्रवार,१० फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# कॉलेज जीवनाचा मनसोक्त आनंद घ्या : जयसिंह

**अकलूज / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी नवनवीन शिकत राहिले पाहिजे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच स्वतःला घडवायला शिकले पाहिजे. कॉलेज जीवनाचा मनसोक्त आनंद घेऊन आपल्यामध्ये असणाऱ्या कलागुणांना वाव दिला पाहिजे, असे मत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूजमधील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय कॅडेट कोअर, जिमखाना विभाग आणि सांस्कृतिक विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी मोहिते-पाटील बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक राजाभाऊ लव्हाळे, मनोज रेळेकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, डॉ. हणमंत आवताडे, ऑफीस अधीक्षक युवराज मालुसरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सन २०२२-२३ या वर्षभरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविला. त्या ७५ विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

मोहिते-पाटील म्हणाले, कला ही माणसाला कसं जगायचं हे शिकवते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीकडे एक तरी कला असायला हवी. ती आपणास जगण्याची ऊर्जा देते. महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच कॉलेज जीवन जगण्याचाही प्रयत्न करणे गरजेचे आहे. कॉलेज जीवन हे पुन्हा मिळत नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतरही क्षेत्रात पारंगत होण्यासाठी प्रयत्न करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवले पाहिजे, असे सांगून पुस्तके वाचणे, विविध प्रकारचे खेळ खेळणे, जास्तीत जास्त तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा, असेही त्यांनी आवाहन केले. गुणवंत विद्यार्थी सन्मान यादीचे वाचन प्रा. अरविंद वाघमोडे, डॉ. विश्वनाथ आवड, प्रा. नंदकुमार गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय बारबोले यांनी केले. तर आभार प्रा. अनिल पराडे यांनी मानले.

लोकमत हॅलो सोलापूर
शुक्रवार १०.०२.२०२३
epaper.lokmat.com

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

विद्यार्थी सन्मान सोहळ्यात ७५ विद्यार्थ्यांचा गौरव

# कॉलेजजीवन जगण्याचा प्रयत्न करा : मोहिते-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

अकलूज : प्रत्येक व्यक्तीकडे कोणती तरी कला असायला हवी. कला ही आपणास जगण्याची ऊर्जा देते. केवळ महाविद्यालय शिकत बसू नका, तर कॉलेज जीवन जगण्याचा प्रयत्न करा. कारण हे जीवन पुन्हा मिळत नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर सर्वच क्षेत्रात स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडवावे, असे आवाहन जयसिंह मोहिते पाटील यांनी केले.

शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय कॅडेट कोअर, जिमखाना विभाग आणि सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.




शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सन्मान करताना जयसिंह मोहिते-पाटील. यावेळी उपस्थित मान्यवर.

यावर्षी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या ७५ विद्यार्थ्यांचा याप्रसंगी प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मोहिते-पाटील यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातले अनेक प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी शिक्षण प्रसारक मंडळाचे व महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालय यश मिळवित आहे, असे सांगितले.

कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक राजाभाऊ लव्हाळे, मनोज रेळेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, डॉ. हणमंत आवताडे उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी सन्मान क्रीडा यादीचे वाचन प्रा. अरविंद वाघमोडे, सांस्कृतिक विभाग यादीचे वाचन डॉ. विश्वनाथ आवड, एनसीसी विभाग यादीचे वाचन प्रा. नंदकुमार गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय बारबोले यांनी केले. आभार प्रा. अनिल पराडे यांनी मानले.

जनमत सर्वसामान्यांचे

सोमवार, २७ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाकडून अकलूजच्या नवीन बसस्थानकाची स्वच्छता

संग्रामनगर दि.२६ (प्रतिनिधी)– अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून अकलूजमधील नवीन बस स्थानकाची स्वयंस्फूर्तीने स्वच्छता केली.गाडगेबाबांनी यांनी स्वच्छतेविषयी समाजात जनजागृती करून सुद्धा आज ही लोक सार्वजनिक ठिकाणी बेफिकीरपणे प्लास्टिकच्या पिशव्या,पाण्याच्या बाटल्या व इतर घनकचरा टाकून परिसर अस्वच्छ करत आहेत. त्यातून लोकांच्या आरोग्यावर हानिकारक परिणाम होत आहेत. त्यामुळे अकलूज बस स्थानकामध्ये अस्ताव्यस्त पडलेला कचरा पाहून शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने बस स्थानकाची स्वच्छता मोहिम हाती घेऊन बस स्थानकाचा परिसर स्वच्छ केला.तसेच रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडांना जाहिरातीचे बॅनर–पोस्टर लावताना लोकांनी मारलेल्या खिळ्यांमुळे झाडांची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याचे दिसून आल्याने स्वयंसेवकांनी झाडाचे खिळे काढून झाडे जगविण्याचा प्रयत्न केला.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे आजी–माजी स्वयंसेवक सहभागी



झाले होते. हे काम करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक सत्यजित चव्हाण,नागनाथ साळवे,प्रशांत वाघमारे,विनायक मंडले,प्रसाद शिंदे,अविनाश देशमुख,प्रतीक फुलेनिलेश खंडागळे,जुनेद मुलाणी,आदित्य पोतदार इत्यादींनी सहभाग घेतला.हा उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.दत्तात्रय मगर,डॉ.सविता सातपुते,प्रा.सज्जन पवार,डॉ.चंकेश्वर लोंढे,डॉ.चंद्रशेखर ताटे–देशमुख यांनी मार्गदर्शन लाभले.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाकडून अकलूजच्या नवीन बसस्थानकाची स्वच्छता

संग्रामनगर दि.२६ (प्रतिनिधी) अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून अकलूजमधील नवीन बस स्थानकाची स्वयंस्फुर्तीने स्वच्छता केली.गाडगेबाबांनी यांनी स्वच्छतेविषयी समाजात जनजागृती करून सुद्धा आज ही लोक सार्वजनिक ठिकाणी बेफिकीरपणे प्लास्टिकच्या पिशव्या,पाण्याच्या बाटल्या व इतर घनकचरा टाकून



परिसर अस्वच्छ करत आहेत. त्यातून लोकांच्या आरोग्यावर हानिकारक परिणाम होत आहेत. त्यामुळे अकलूज बस स्थानकामध्ये अस्ताव्यस्त पडलेला कचरा पाहून शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने बस स्थानकाची स्वच्छता मोहिम हाती घेऊन बस स्थानकाचा परिसर स्वच्छ केला.तसेच रस्त्याच्या बाजूला असलेल्यां झाडांना जाहिरातीचे बॅनर–पोस्टर लावताना लोकांनी मारलेल्या खिळ्यांमुळे झाडांची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याचे दिसून आल्याने स्वयंसेवकांनी झाडाचे खिळे काढून झाडे जगविण्याचा प्रयत्न केला.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे आजी–माजी स्वयंसेवक सहभागी झाले होते. हे काम करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक सत्यजित चव्हाण, नागनाथ साळवे, प्रशांत वाघमारे, विनायक मंडले, प्रसाद शिंदे, अविनाश देशमुख, प्रतीक फुलेनिलेश खंडागळे, जुनेद मुलाणी,आदित्य पोतदार. इत्यादींनी सहभाग घेतला. हा उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दत्तात्रय मगर, डॉ.सविता सातपुते, प्रा.सज्जन पवार, डॉ.चंकेश्वर लोंढे, डॉ.चंद्रशेखर ताटे–देशमुख यांनी मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी
SMA
सोमवार,२७ फेब्रुवारी २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# मराठीतील वाचावेसे असे काही...

## मान्यवर साहित्यिक, स्तंभलेखक यांची ललित व ललितेतर शिफारस

निमित्त मराठी भाषा दिन

**मुंबई :** मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, ही अपेक्षा आणि मराठी ज्ञानभाषा व्हावी, हे स्वप्न डोळ्यांत घेऊन कोट्यवधी मराठीप्रेमी सोमवारी कुसुमाग्रज जयंती दिनी समाजमाध्यमांतून विविध प्रकारे व्यक्त होतील. मराठीला गौरवाचे स्थान प्राप्त व्हावे, हीच त्यांची यामागील मनीषा. ती पूर्णत्वास नेण्याचा एक मार्ग मराठीतील ललित व ललितेतर साहित्याचे वाचन वाढवणे. आजही कोट्यवधी मराठीजनांच्या घरात मराठी ललित पुस्तकांना साधा कोनाडाही नाही, अशी स्थिती आहे. ती दूर होणे मराठीच्या भल्यासाठी आवश्यक.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने येथे सादर करत आहोत, दै. 'पुण्यनगरी'च्या काही स्तंभलेखकांनी शिफारस केलेली वाचावीत आणि संग्रही ठेवावीत अशी महत्त्वाची पुस्तके. काय वाचावे हा अनेकांपुढील प्रश्न असतो. तो दूर होऊन वाचनाची दिशा ठरवण्यासाठी ही छोटीशी यादी नक्कीच उपयुक्त ठरेल.




**प्रदीप निफाडकर**
१. मृत्युंजय - शिवाजी सावंत, २. ऋतुचक्र - दुर्गा भागवत, ३. एल्गार - सुरेश भट, ४. व्यक्ती आणि वल्ली - पु.ल. देशपांडे, ५. लामणदिवा - रवींद्र पिंगे

**◆ संजय सोनवणी**
१. खुलूस- समीर गायकवाड, २. दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी - बालाजी सुतार, ३. मम आत्मा गमला - मिलिंद कर्वे, ४. पुराकथांचा अर्थ - सदाशिव अंबादास डांगे, ५. उजव्या सोंडेच्या बाहुल्या - प्रवीण बांदेकर



**◆ विश्वास पाटील**
१. फकिरा - अण्णा भाऊ साठे, २. श्यामची आई - साने गुरुजी, ३. आषाढस्य प्रथम दिवसे - आचार्य अत्रे, ४. महासम्राट - विश्वास पाटील, ५. आई आहे शेतात - रघुनाथ वामन दिघे







**◆ डॉ. मुकुंद कुळे**
१. श्यामची आई - सानेगुरुजी, २. युगान्त - इरावती कर्वे, ३. एन्कीच्या राज्यात - विलास सारंग, ४. फिनिक्सच्या राखेतून उठला मोर - जयंत पवार, ५. भिजकी वही - (अरुण कोलटकर)

**◆ दीपा देशमुख**
१. शोध... नेहरू-गांधी पर्वाचा - सुरेश भटेवरा, २. दोन शतकाच्या सांध्यावरची गोष्ट - बालाजी सुतार ३. ते आठ दिवस - अरुणा सबाने, ४. चार्वाक - सुरेश द्वादशीवार, ५. खुलूस : रेडलाईट डायरीज - समीर गायकवाड

**◆ रवि आमले**
१. तुकारामबावांच्या अभंगांची गाथा (महाराष्ट्र शासन), २. छत्रपती शिवाजी महाराज जीवन रहस्य - नरहर कुरुंदकर, ३. साता उत्तराची कहाणी - ग. प्र. प्रधान, ४. भारताचा शोध - पं. जवाहरलाल नेहरू, ५. लीळाचरित्रातील समाजदर्शन - सुमन बेलवलकर




**◆ नंदिनी आत्मसिद्ध**
१. स्मृतिचित्रे - लक्ष्मीबाई टिळक, २. आधुनिक भारत - शं. द. जावडेकर, ३. ऋतुचक्र - दुर्गा भागवत, ४. कोसला - भालचंद्र नेमाडे, ५. गोलपिठा - नामदेव ढसाळ




**◆ घनश्याम पाटील**
१. पाडस - राम पटवर्धन, २. राजधानीतून - अशोक जैन, ३. संघर्ष हेच सामर्थ्य - रवींद्र खंदारे, ४. शांताराम - ग्रेगरी डेविड रोबर्ट्स, ५. गुलमोहराचं कुकू - प्रशांत केंदळे



सुराज्य सोलापूर

बुधवार, दि.०१ मार्च २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101
Library

# सकारात्मक विचाराने स्वतःला घडवा : डॉ.आवाड

**अकलूज** : शरीराचा रंग व ठेवण, बुद्धी इत्यादी गोष्टी घेऊन व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला आनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. जसे आहे तसे जगायला शिका, सकारात्मक विचार केल्याने आयुष्याला नवी दिशा मिळते यातून धाडस संयम निर्माण होतो.न्यूनगंडाची मालिका बाजूला पडून व्यक्तिमत्व विकास घडून येतो.असे प्रतिपादन इतिहास संशोधक प्रा.डॉ.विश्वनाथ आवाड यांनी केले.शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयात आयोजित चणक्ष नाशिक



अंतर्गत बहिःशाल शिक्षण मंडळ योजना अंतर्गत व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरती प्रा.डॉ.विश्वनाथ आवाड यांचे विद्यार्थ्यांच्या करीता मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.स्वतःच्या क्षमता ओळखा, स्वतःचा स्वीकार करा आपल्यातील वीक पॉइंट्सला प्लस पॉईंट बनवा , जिथे संधी मिळेल ती सोडू नका.पृथ्वीवर ८ अब्ज लोकसंख्या आहे आपल्यातील प्रत्येकजण वेगळा आहे.आपण कोण आहोत, काय आहोत ,हे ओळखून घ्या व आपल्या कम्फर्ट झोन मधून बाहेर पडा न्यूनगंडावर मात करा स्वतःच्या मन मेंदू शरीराचा विकास करा असे डॉ.आवड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयीन व्यवस्थापन समिती चेअरमन पराग गायकवाड, प्राचार्य प्रसाद पाटील,अश्रफ शेख इतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

पुण्य नगरी
बुधवार, १ मार्च २०२३ ‖ पुणे-सोलापूर
३

# सकारात्मक विचाराने स्वतः ला घडवा : डॉ. विश्वनाथ आवड

अकलूज / प्रतिनिधी

शरीराचा रंग, ठेवण, बुद्धी या गोष्टी घेऊन व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला आनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. जसे आहे तसे जगायला शिका. सकारात्मक विचार केल्याने आयुष्याला नवी दिशा मिळते. यातून धाडस संयम निर्माण होतो. न्यूनगंडाची मालिका बाजूला पडून व्यक्तिमत्व विकास घडून येतो. असे प्रतिपादन इतिहास संशोधक प्रा.डॉ. विश्वनाथ आवाड यांनी केले.

शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयात आयोजित एमयूएचएस नाशिक अंतर्गत बहिःशाल शिक्षण मंडळ योजना अंतर्गत व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरती प्रा.डॉ. विश्वनाथ आवाड यांचे विद्यार्थ्यांच्या करीता मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

स्वतःच्या क्षमता ओळखा, स्वतःचा स्वीकार करा. आपल्यातील वीक पॉइंट्सला प्लस पॉईट बनवा, जिथे संधी मिळेल ती सोडू नका. पृथ्वीवर ८ अब्ज लोकसंख्या आहे, आपल्यातील प्रत्येकजण वेगळा आहे. आपण कोण आहोत, काय आहोत, हे ओळखून घ्या व आपल्या कम्फर्ट झोन मधून बाहेर पडा. न्यूनगंडावर मात करा. स्वतःच्या मन, मेंदू शरीराचा विकास करा असे डॉ. आवड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयीन व्यवस्थापन समिती चेअरमन पराग गायकवाड, प्राचार्य प्रसाद पाटील, अश्रफ शेख व इतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

जनमत सर्वसामान्यांचे
शुक्रवार, ०३ मार्च २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *


# अनुभवसिद्ध ज्ञान हा विज्ञानाचा पाया आहे : प्रा.विष्णू सुर्वे

संग्रामनगर दि.०२ (प्रतिनिधी)– अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये विज्ञान मंडळ,रसायनशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी इंग्रजी विभागाचे प्रा. विष्णू सुर्वे यांचे वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या भाषणामध्ये ते म्हणाले की विज्ञान आणि तंत्रज्ञान मानवी जीवनासाठी अत्यावश्यक आहे. तसेच उत्सुकता,जिज्ञासा व चिकित्सा ही विज्ञानाची त्रिसूत्री आहे.वैज्ञानिकांमुळे मानवी जीवन समृद्ध झाले आहे. आपण त्यांच्या बद्दल नेहमी कृतज्ञ असले पाहिजे.पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे व आपले आदर्श बदलण्याचे आवाहन केले.

यावेळी अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवण्याचे व चिकित्सक बुद्धीने नवनिर्मिती करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

याप्रसंगी रसायनशास्त्र विभागातर्फे आयोजित निबंध स्पर्धेचा निकाल डॉ.डी.आर. कांबळे मॅडम यांनी जाहीर केला. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बागडे यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रा.आर. एच.कुंभार, डॉ.एस.यु.शिंदे,




डॉ. एस.के.ढिळेकर, डॉ.सी. एस.पवार, डॉ.एस.एम.सातपुते, डॉ.ए.आर.बाबर, प्रा.ए.एस. रेळेकर, प्रा.राहणे, डॉ.सी.व्ही. ताटे–देशमुख, डॉ.पी.एम.खराडे, जितेंद्र बाजारे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.एस.देवकर यांनी केले. प्रा. कु.वसेकर यांनी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एस्सी.भाग २ ची विद्यार्थिनी कु.ऋतुजा कदम हिने केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.यु.जे. वाघमोडे, प्रा.आर.ए.सुर्वे, बी.एस्सी.भाग ३ मधील सर्व विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जनमत
## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, लातूर

बुधवार ०८ मार्च २०२३


Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाची अभ्यास सहलचे आयोजन

संग्रामनगर दि.०७ (प्रतिनिधी)– अकलूजच्या शंकरराव मोहिते म हाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग बीएससी भाग ३ च्या वर्गाची अभ्यास सहल उजनी जलाशयवरील अभयारण्य पक्षी निरीक्षण,मत्स्य बीज केंद्र आणि उजनी धरण इत्यादी ठिकाणी जाऊन पक्षांचे निरीक्षण मत्स्यपालन व मत्स्य पालनासाठी लागणारे क्राफ्ट अँड गिअर्स इत्यादी प्रात्यक्षिक अभ्यास क्रमातील बाबींचे निरीक्षण केले.





या अभ्यास सहलीमध्ये पक्षी अभयारण्याचे प्रचंड कुतूहल विद्यार्थ्यांमध्ये जाणवत होते.या परिसरात विदेशी स्थलांतरीत विविध पक्षांचे आगमन झालेले आहे. त्यामध्ये फ्लेमिंगो,वेगवेगळ्या जातीचे बगळे,पान कोंबडी असे अनेक पक्षी आढळून आले. हे पक्षी अन्न व प्रजननासाठी स्थलांतरीत झालेले असतात. हे निरीक्षणातून दिसून आले.यावेळी मासेमारी हा सोपा व फायदेशीर व्यवसाय आहे याची ही महिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या व्यवसायासाठी बोट,मासेमारीसाठी लागणारे जाळे,हुक्स,सिंकरर्स म्हणजेच क्राफ्ट आणी गियरर्सची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्षिकातून देण्यात आली.त्यानंतर मत्सबीज केंद्र येथे अभ्यास भेटीतून विद्यार्थ्यांना मत्स्य संवर्धन व मत्स्य व्यवसायबद्दल सखोल माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.यापुढे प्राणीशास्त्राच्या अभ्यासाकांना प्राणीशास्त्र विषयातील महत्त्व व गरज दिसून येते सदर सहलीमध्ये बीएससी भाग ३ वर्गातील १३ विद्यार्थी व विद्यार्थिनी व सोबत सहल प्रमुख प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ सुधा बनसोडे होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

सकाळ सोलापूर
मंगळवार, २८ मार्च २०२३
TODAY

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र उत्साहात

**अकलूज, ता. २७ :** शंकरराव मोहिते महाविद्यालयात एक दिवसीय राज्यस्तरीय 'ॲडव्हान्सेस इन टिशू कल्चर टेक्निक्स' या विषयावर चर्चासत्र उत्साहात पार पडले.

या चर्चासत्रात सुमारे दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या चर्चासत्राचे उद्घाटन ऋतुजादेवी मोहिते-पाटील यांचे हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकात वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. रामलिंग सावळजकर यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव उपकेंद्राचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी टिशू कल्चरचे कृषी क्षेत्रातील महत्त्व सांगितले. चर्चासत्र यशस्वितेसाठी प्रा. विक्रम कुंभार, रोहित कुंभार, प्रमोद घोगरे, नंदकुमार गायकवाड, प्रतिभा नलवडे, ज्योती फुले, अस्मिता माने, स्नेहल पांढरे, युवराज मालुसरे, महेंद्र साठे, बापू कदम व मारुती गायकवाड आदींनी सहकार्य केले. सूत्रसंचालन डॉ. सविता सातपुते व प्रा. राणी पवार यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी
दिव्य मराठी. शनिवार, २० मे २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

**स्नेहमेळावा** • अकलूजला शंकरराव मोहिते महाविद्यालयात गुरू-शिष्य कृतज्ञता मेळावा

# अकलूजला चार वर्षांतील २१० माजी विद्यार्थ्यांकडून गुरूंप्रती ऋण व्यक्त

## शालेय आठवणीच्या गप्पात रमले शिक्षक-माजी विद्यार्थी

प्रतिनिधी | अकलूज

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात २००१ ते २००४ या वर्षातील विद्यार्थ्यांनी एकत्र येत गुरू-शिष्य कृतज्ञता मेळावा आयोजित केला होता. त्यात विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या २१० विद्यार्थ्यांनी गुरूंप्रती ऋण व्यक्त केले. माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख प्रमुख पाहुणे होते. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे अध्यक्षस्थानी होते. या मेळाव्यात आजी-माजी शिक्षकही सहभागी झाले होते.



अकलूजमधील मोहिते महाविद्यालयात जमलेले गुरू-शिष्य.

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी शिवाजी नलवडे, शंकर बागडे, अल्ताफ आतार, सुधीर शेळके, गोपाळ साळुंखे, उज्ज्वला जगदाळे, वैशाली तरसे, धनश्री उरणे, पराग चौधरी, गणेश सूळ यांनी प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, शिक्षकेतर कर्मचारी त्यांच्याबद्दल ऋण व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. मेळावा यशस्वी करण्यासाठी हेमा सुर्वे, अनुसया मगर, अण्णासाहेब शिंदे, अण्णासाहेब मगर, पितांबर मिसाळ, मल्हारी मगर, अश्वराज वाघ, सुखदेव घुले, अरुण गुजर, आनंदराव मांडवे, सुनील कुदळे, दत्तात्रेय भोसले, जयकुमार जाधव, हरीश टिक, धनंजय जाधव, ताज खान पठाण, राहुल नवले, विजय वाळेकर, दिलीप खिचडे, नाना साळुंखे, संतोष साठे, हनुमंत भित्ते यांनी परिश्रम घेतले. माजी विद्यार्थी शहाजी दुपडे यांनी सूत्रसंचलन केले. लीना बरखडे यांनी आभार मानले.

### प्रत्येक काम मनापासून आनंदाने करावे

कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी काम करताना प्रचंड जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अपेक्षित यश मिळणार नाही. प्रत्येक काम मनापासून व आनंदाने करावे तरच काम चांगले होते, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख यांनी केले.